मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले






● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २३६ ■ शनिवार, ०९ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514


# एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर पूर्ण करा – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## भूजल पातळी वाढविण्यासाठी कामे करण्याचे निर्देश

**मुंबई :** एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण तसेच जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गतची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यात यावीत. तसेच भूजल पातळी कमी झालेल्या ठिकाणी प्राधान्याने कामे करून तेथील भूजल पातळी वाढविण्यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी वर्षा या शासकीय निवासस्थानी मृद व जलसंधारण विभागाचा आढावा घेतला. यावेळी मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे जल -विषयक सल्लागार श्रीराम वेदिरे, विशेष कार्य अधिकारी प्रिया खान, मृद व जलसंधारण आयुक्त अंजली रमेश, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय देवराज आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एल निनोच्या पार्श्वभूमीवर भूजल पातळी वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी जलसंधारण, जलयुक्त शिवारमधील कामांचे प्राधान्य ठरवून ती पूर्ण करण्यात यावीत. तसेच जलयुक्त शिवार २.० अंतर्गत समाविष्ट गावांमध्ये दुरुस्तींच्या कामांची निकड पाहून ही कामे आराखड्यात समाविष्ट करून तातडीने पूर्ण करावीत. जलयुक्तमधील राज्यस्तरीय आराखडे १५ मे पूर्वी मंजूर करण्यात यावेत. तसेच जिल्ह्यांना सुधारित आराखडे देऊन कामांना गती द्यावी. जलयुक्त शिवारची कामे हाती घेतलेल्या गावांबाहेरील १० टक्के कामेही प्राधान्यक्रम ठरवून हाती घेण्यात यावीत.

केंद्र शासनाच्या ‘विकसित भारत जी राम जी’ योजनेमध्ये जलसंधारणाच्या कामांवर भर



देण्यात आला आहे. त्याचा लाभ घेऊन राज्यातील जलसंधारणाची कामे पूर्ण करून घ्यावीत. जलसंधारण कामाअंतर्गत नालाखोलीकरणची कामे करताना त्याठिकाणी पुन्हा गाळ होऊ नये, यासाठी नाल्याच्या ठिकाणी बांबू लागवड करण्याचा विचार करावा. विदर्भातील मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीची कामे जून महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन करावे. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत वाढीव निधी मिळण्यासाठी केंद्रीय मंत्री यांना स्वतः भेटणार असल्याचेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड म्हणाले की, मृद व जलसंधारण विभागाच्या आकृतीबंधाला मंजुरी मिळाल्याने आता कामास गती येईल. आतापर्यंत मंजुरी दिलेली कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे. तसेच मूळ आराखड्यानुसारच कामे पूर्ण व्हावीत यासाठी मार्गदर्शक सूचना तयार केल्या आहेत. मालगुजारी तलावांच्या ठिकाणी असलेली अतिक्रमणे काढण्याची परवानगी मिळावी.

सचिव पापळकर यांनी सांगितले की, जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत विशेष निधी व अभिसरणअंतर्गत आतापर्यंत गाव आराखड्याप्रमाणे १ लाख ४४ हजार ६९७ कामे मंजूर झाली आहेत. त्यापैकी १ लाख १० हजार १२० कामे पूर्ण झाली आहेत. ऊर्वरित कामे प्रगतीपथावर असून लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. एल निनोच्या पार्श्वभूमीवर टँकरग्रस्त आणि भूजल पातळी खालावलेल्या गावांमध्ये प्राधान्याने कामे हाती घेण्यात आली आहेत. तसेच विविध योजनाअंतर्गत पाणलोट क्षेत्रात झालेल्या मृद व जलसंधारण कामांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी करण्याचे काम सुरू असून आतापर्यंत १५ लाख १५ हजार कामांपैकी १२ लाख २७ हजार संरचनांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी झाली आहे.गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार अंतर्गत यावर्षी १४३५ जलसाठ्यातून ४७७.७३ लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे ३०८३५ सघमी पाणीसाठा पुनर्स्थापित झाला असून ७३ हजार ४१७ एकर क्षेत्र सुपिक झाले आहे. या वर्षी १५ जून पर्यंत जिल्हानिहाय गाळ काढण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत आतापर्यंत २२ हजार कामे पूर्ण झाली असून त्यांचे जिओ टॅगिंग करण्यात आले आहे. तसेच पाणलोट विकास घटकांतर्गत ५७ अमृत सरोवर तयार करण्यात येत असून १५ जूनपर्यंत ३१ अमृत सरोवर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. विभागाच्या पाच वर्षाच्या बृहद आराखड्याअंतर्गत राज्यातील २७ हजार ९४२ सूक्ष्म पाणलोटांमध्ये १ लाख २१ हजार ५८३ कामे प्रस्तावित करण्यात आली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## रायगड जिल्ह्यातील शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते बबनदादा पाटील यांनी केला नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा विशेष सत्कार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या रायगड जिल्ह्यातील पनवेल विधानसभा क्षेत्रातील शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आज जाहीर करण्यात आल्या आहेत. या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा शिवसेना उपनेते बबनदादा पाटील यांनी केला नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा विशेष सत्कार केला. यामध्ये जिल्हाप्रमुख दीपक निकम (पनवेल विधानसभा), उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील (पनवेल, शहर), भरत पाटील (पनवेल, ग्रामीण), महानगरप्रमुख समाधान काशिद (पनवेल महानगरपालिका) यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून त्यांचा आज शिवसेना उपनेते बबनदादा पाटील यांनी विशेष सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



नवीनवर्चित पदाधिकाऱ्यांनी बबनदादा पाटील ची सदिच्छा भेट घेतली

## भिलेवाडा येथे विज्ञाननिष्ठ बालसंस्कार शिबिर उत्साहात संपन्न ; ग्यानचंद जांभूळकर यांनी उलगडले अंधश्रद्धेचे ‘वैज्ञानिक’ रहस्य

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे भंडारा - :** भिलेवाडा येथे अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा भंडाराची उपाध्यक्ष ग्यानचंद जांभूळकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित बालसंस्कार शिबिरात विद्यार्थ्यांनी विज्ञानाचा अनोखा आणि रोमांचक अनुभव घेतला. समाजकार्यकर्ते विलास केजरकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या शिबिरात अंधश्रद्धा निर्मूलन, विज्ञाननिष्ठ विचार आणि जिज्ञासू वृत्तीचा प्रभावी संदेश देण्यात आला.

मार्गदर्शन करताना ग्यानचंद जांभूळकर म्हणाले की, “विद्यार्थ्यांनी विज्ञानाची कास पकडल्याशिवाय समाजाचा खरा विकास होऊ शकत नाही.” त्यांनी समाजात वाढत चाललेल्या अंधश्रद्धा, बनावट बाबा-बुवांचा प्रभाव आणि त्यांच्या माध्यमातून होणारे आर्थिक, मानसिक व शारीरिक शोषण यावर कठोर शब्दांत प्रहार केला.

ते पुढे म्हणाले की, देशात लाखो भोंदू बाबा विविध चमत्कारांच्या नावाखाली लोकांची फसवणूक करतात. विज्ञानाचा वापर करून लोकांना घाबरवणे, भ्रम निर्माण करणे आणि अंधश्रद्धेला खतपाणी घालणे हे प्रकार सुरू आहेत. “जगात कुठलाही चमत्कार नसून, प्रत्येक गोष्टीमागे विज्ञान असते,” असा ठाम संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. यावेळी जांभूळकर यांनी विज्ञानाच्या साहाय्याने विविध प्रयोग करून दाखवत



तथाकथित चमत्कारांचे रहस्य उलगडले. हातावर कापूर जाळणे, तोंडात कापूर घेणे, रुमालाची गाठ सोडणे, लिंबूतून रक्त किंवा वस्तू काढणे, नारळातून वस्तू बाहेर काढणे तसेच चिठ्ठीतील नावे ओळखण्याचे प्रयोग पाहून विद्यार्थी अक्षरशः मंत्रमुग्ध झाले.

अध्यक्षीय भाषणात विलास केजरकर यांनी विद्यार्थ्यांना “प्रत्येक गोष्टीमागे ‘का’ आणि ‘कसे’ हा प्रश्न विचारण्याची सवय लावा,” असे आवाहन केले. विज्ञाननिष्ठ आणि चिकित्सक विचारसरणीच समाजाला प्रगतीकडे नेऊ शकते, असेही त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे सुंदर संचालन व आभार प्रदर्शन परी गोस्वामी (इयत्ता आठवी) हिने केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि विज्ञान प्रयोगांमुळे संपूर्ण शिबिरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# हराशीला उशीर; संतप्त शेतकऱ्यांचा वाशिम बाजार समितीत सोयाबीन जाळून संतापाचा उद्रेक!

## खरीप हंगामाच्या तोंडावर बाजार समितीचा भोंगळ कारभार उघड; तासन्तास प्रतीक्षेमुळे शेतकऱ्यांचा संताप अनावर

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशीम खरीप हंगामाच्या तोंडावर खत-बियाणे, शेती मशागत आणि इतर खर्चांसाठी पैशांची निकड असताना कृषी उत्पन्न बाजार समिती, वाशिम येथील ढिसाळ नियोजनाचा फटका शुक्रवारी (दि. ८ मे) शेतकऱ्यांना बसला. सकाळपासून सोयाबीन व इतर कृषी माल घेऊन आलेल्या शेतकऱ्यांची हराशी दुपारी १ वाजेपर्यंतही सुरू न झाल्याने संतप्त शेतकऱ्यांनी बाजार समिती परिसरातच सोयाबीन जाळून जोरदार निषेध नोंदविला. या प्रकारामुळे बाजार समिती परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.तालुक्यातील विविध गावांमधून अनेक शेतकरी ट्रॅक्टर, पिकअप आणि अन्य वाहनांद्वारे कृषी माल विक्रीसाठी घेऊन बाजार समितीत दाखल झाले होते. सकाळी लवकरपासूनच बाजार समिती



परिसरात शेतकऱ्यांची मोठी गर्दी झाली होती. मात्र हराशी प्रक्रियेला सुरुवातच न झाल्याने शेतकऱ्यांना उन्हात तासनतास थांबावे लागले. वाढत्या उन्हामुळे अनेक शेतकरी त्रस्त झाले होते.खरीप हंगामासाठी लागणाऱ्या खत-बियाण्यांच्या खरेदीसाठी आणि शेतीच्या कामांसाठी पैसे उभे करण्यासाठी शेतकरी बाजार समितीकडे आशेने येतात. मात्र वेळेत हराशी न झाल्याने त्यांचे आर्थिक नियोजन कोलमडत असल्याची तीव्र नाराजी यावेळी व्यक्त करण्यात आली. “दिवसभर बाजार समितीत थांबूनही व्यवहार होत नसतील तर शेती कशी करायची?” असा सवाल संतप्त शेतकऱ्यांनी उपस्थित केला.दरम्यान, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हाध्यक्ष सतीश इढोळे यांनी संतप्त शेतकऱ्यांसह बाजार समिती प्रशासनाशी संपर्क साधून तातडीने हराशी सुरू करण्याची मागणी केली.

> **“शेतकरी पहाटेपासून माल घेऊन बाजार समितीत येतात. मात्र तासन्तास हराशीच सुरू होत नसेल तर हा शेतकऱ्यांवरील अन्याय आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर पैशांची गरज असताना प्रशासनाची दिरंगाई शेतकऱ्यांचे मोठे नुकसान करणारी आहे. भविष्यात असा प्रकार पुन्हा घडल्यास संघटना तीव्र आंदोलन उभारेल.”**
>
> **सतिश इढोळे**
> **युवा जिल्हाध्यक्ष क्रांतीकारी शेतकरी संघटना**

प्रशासनाकडून समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने काही शेतकऱ्यांनी संतापाच्या भरात सोयाबीनच्या पोत्यांना आग लावत निषेध आंदोलन केले. या घटनेने बाजार समिती प्रशासनाची धावपळ उडाली.शेतकऱ्यांच्या आक्रमक भूमिकेनंतर अखेर बाजार समिती प्रशासनाने हालचाल करत हराशी प्रक्रिया सुरू केली. त्यानंतर सोयाबीनसह विविध कृषी मालाची बाजारभावानुसार हराशी करण्यात आली. त्यामुळे काही प्रमाणात शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असला तरी प्रशासनाच्या निष्काळजीपणाबाबत तीव्र नाराजी कायम असल्याचे चित्र दिसून आले.

शेतकरी संघटनांनी बाजार समिती प्रशासनाला इशारा देत भविष्यात अशा प्रकारचा विलंब झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना वेळेत सेवा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असून बाजार समितीने त्यासाठी ठोस नियोजन करावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून करण्यात आली.

## पनवेल तालुका पोलीस ठाण्यातील जितेंद्र विठ्ठल म्हात्रे यांना पोलीस उपनिरीक्षक पदाची बढती



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत असणारे जितेंद्र विठ्ठल म्हात्रे यांना महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागातर्फे पोलीस उपनिरीक्षक पदाची बढती देण्यात आली आहे .

जितेंद्र विठ्ठल म्हात्रे हे १/०१/१९९३ साली पोलीस खात्यात कॉन्स्टेबल म्हणून भरती झाले .प्रथम त्यांनी रायगड जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात कामकाज पहिले त्यानंतर त्याची बदली नवी मुंबई आयुक्तालयात झाली . यामध्ये विशेष शाखा ,खंडणी विरोधी पथक , गुन्हेशाखा विविध पोलीस ठाणे येथे कार्यरत राहून त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला या कामाची दखल शासनाने घेऊन त्यांना २०२५ साली राष्ट्रपती पदक देण्यात आले . सध्या ते पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे कार्यरत असताना त्यांना पोलीस उपनिरीक्षक पदाची बढती देण्यात आल्याने सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे .

# मातोश्री विद्यालयचा एस.एस.सी बोर्ड परीक्षेत १००% निकाल

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव (यवतमाळ ) :** महागाव येथील स्थानिक मातोश्री माध्यमिक विद्यालयाचा मार्च 2026 मध्ये इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा शंभर टक्के निकाल लागला असून विद्यालयाने यशाची परंपरा कायम ठेवली आहे. मातोश्री इंग्लिश मीडियम मधून श्रद्धा साईनाथ पडगिलवार ९६.४० प्रथम, भक्ती मनोज येलूरवार ९६.२० द्वितीय तर स्वराज रविकांत पतंगराव ९५.८० गुण घेऊन तृतीय क्रमांक प्राप्त केला. मातोश्री माध्यमिक विद्यालयातून ओम सतिष गावंडे यांने 95.80 प्रथम तर, कु. अक्षरा दत्तराव शिंदे 93.60,कु. पूर्वा अरविंदराव गंगात्रे 93.60 द्वितीय, तर कु. तनिष्का पंडित मस्के 92.60, कृष्णा लक्ष्मण ठाकरे 92.60 तृतीय क्रमांक मिळवला.




तर विद्यालयातून एकूण २१३ प्रविष्ट विद्यार्थ्यापैकी १५३ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले तर ४८ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीसह यष संपादन केले. तर गणित याविशयात कु. श्रद्धा पडगिलवार ,स्वराज पतंगराव, कु. आस्था गावंडे, कु. राजनंदनी करपे, कु. नर्मदा सरकाटे, कु. स्वरा अरगुलवार, कु. अदिती राउत हया विद्यार्थ्यांनी गणित विशयात 100 पैकी 100 गुण प्राप्त केले तसेच विज्ञान या विशयात कु. भक्ती येलुरवार हिने 100 पैकी 100 गुण प्राप्त केले. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे मातोश्री शिक्षण संस्थेचे संस्थापक दिगंबर जगताप यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय मुख्याध्यापक शिक्षकवृंद व पालक यांना देतात. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यषाबददल सर्व स्तरातून विद्यार्थी पालक व शिक्षक वृंदांचे कौतुक होत आहे.

# पोलीस मुख्यालय गोंदिया येथे शारिरीक व मानसिक निरोगी राहण्याकरिता ताण-तणावाचे नियोजन व जीवन कौशल्य या विषयावर कार्यशाळेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी :** गोंदिया पोलीस दलातील महिला पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्या रोजच्या कामातील अंत्यत महत्वाचे जबाबदारी, कर्तव्यदक्ष व तणावपुर्ण कामाबरोबर घरगुती जबाबदाऱ्या आणि सेवाकार्य यांचा समतोल राखताना यांच्यावर मोठ्या प्रमाणात मानसिक ताणतणाव येत असतो. त्याचा परिणाम त्यांचे शारिरीक, मानसिक आरोग्यावर तसेच पारिवारीक जीवन व कामकाजाचे ठिकाणी दिसून येतो, शरीर निरोगी राहण्याकरिता योग्य आहार, स्वस्थ जीवनशैली आणि मनाची अवस्था या गोष्टी आवश्यक असुन निरोगी स्वास्थ्यासाठी पोलीस अधिक्षक गोंदिया मा. श्री. गोरख भामरे व अपर पोलीस अधीक्षक गोंदिया



(कॅम्प देवरी) मा. श्री. अभय डोंगरे यांचे मार्गदर्शनाखाली महिला पोलीस अधिकारी / अंमलदारांकरिता दिनांक ०५/०५/२०२६ व ०६/०५/२०२६ रोजी पोलीस मुख्यालय गोंदिया येथे ताण-तणावाचे नियोजन व जीवन कौशल्य या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेत प्रमुख वक्ते डॉ. अरुधंती भालेराव (भालेराव इव्हेंटस अँड मॅनेजमेंट, ठाणे) यांच्या वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक, नागेश भास्कर यांनी त्यांना पुष्पगुच्छ देवुन गोंदिया जिल्हा पोलीस दलाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

सदर कार्यशाळेत प्रमुख वक्ते डॉ. अरुधंती भालेराव यांनी आजच्या काळात महिला पोलीसांवर कुटुंब, कर्तव्य, समाज आणि स्वतःकडुन येणाऱ्या अपेक्षांचा मोठा ताण असतो. बदलत्या जबाबदाऱ्या, मानसिक दबाव, अनिश्चित वेळा आणि भावनिक आव्हानांमुळे हा ताण अधिक वाढतो. या पार्श्वभुमीवर आयोजित कार्यशाळेत स्वतःच्या मनाशी संवाद सांधणे, ताण ओळखणे आणि तो सकारात्मक पध्दतीने हाताळणे यावर विशेष भर देण्याकरिता विविध खेळ, समुहकृती आणि कृतीयुक्त पध्दतींच्या माध्यमातुन ०६ तासांचे प्रशिक्षण देण्यात आले. नकारात्मकतेतून सकारात्मकतेकडे वाटचाल करण्यासाठी या उपक्रमातुन महिला पोलीसांना मानसिक दृष्ट्या अधिक सक्षम, आत्मविश्वासी आणि संतुलित बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच भावनिक समतोल, निर्णयक्षमता आणि जीवनकौशल्ये विकसित करण्यावरही मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यशाळेत जवळपास एकुण १६५ च्या संख्येने महिला पोलीस अधिकारी/ अंमलदारांनी उपस्थित राहुन उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

सदर कार्यशाळा यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी मपोनी नंदिनी चानपूरकर, रापोनि राजेश सरोदे, रापोउपनि दिपक गेडाम, सफौ मुस्तफा सरवर, पोहवा लिओनार्ड मार्टिन, संतोष पारधी, राज वैद्य, पोकॉ अतुल कोल्हाटकर, मपोकॉ पल्लवी गजभिये व पोलीस मुख्यालय गोंदिया येथील डी.आय. स्टाफ यांनी अथक परिश्रम घेतले. सदर कार्यशाळेचे सुत्र संचालन व आभार प्रदर्शन पोलीस हवालदार राज वैद्य यांनी केले.


# पत्रकारितेतील तळागळातील शब्दांना सलाम;पत्रकार व संपादक सन्मान सोहळा 2026 चे आयोजन; पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई,(केतन भोज) :** समाजातील प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या आणि कोणत्याही परिस्थितीत सत्य मांडणाऱ्या पत्रकारांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आर्यारवी एंटरटेनमेंट ’तर्फे ‘पत्रकार व संपादक सन्मान सोहळा 2026 ’चे आयोजन करण्यात आले आहे. अभिनय,दिग्दर्शन आणि पत्रकारिता क्षेत्रात 30 वर्षांहून अधिक काळ कार्यरत असलेले महेश्वर भिकाजी तेटांबे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकारत आहे.‘आर्यारवी एंटरटेनमेंट ’या संस्थेच्या माध्यमातून महेश्वर तेटांबे यांनी सलग चार वर्षे




राष्ट्रीय आणि आतंरराष्ट्रीय लघुपट महोत्सव,राज्यस्तरीय कराओके गीत गायन स्पर्धा,सेलिब्रिटी क्रिकेट मॅच असे अनेक उपक्रम राबवून ते यशस्वीरीत्या पार पाडले आहेत. आता त्यांनी ‘आर्यारवी एंटरटेनमेंट ’च्या माध्यमातून ‘पत्रकार,संपादक यांचा सन्मान सोहळा 2026’ हा उपक्रम हाती घेतला असून मुख्य प्रवाहातील माध्यमांसोबतच ग्रामीण भागातील मुक्त वार्ताहर,साप्ताहिक-पाक्षिकांचे प्रतिनिधी,डिजिटल न्यूज पोर्टल संपादक,तळागाळातील पत्रकार,संपादक आणि सोशल मीडिया माध्यमांतून कार्यरत पत्रकारांना या सोहळ्यात विशेष व्यासपीठ मिळणार आहे.तळागाळात काम करणाऱ्या पत्रकारांच्या योगदानाचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार असून,पत्रकारितेतील निष्ठा,निर्भीडपणा आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तींना विविध पुरस्कारांनी सन्मानित केले जाणार आहे.या सन्मान सोहळ्यात ‘स्वाभिमान लेखणी सन्मान पुरस्कार ’‘शब्दवेध गौरव सन्मान पुरस्कार’ ‘अजेय लेखणी सन्मान पुरस्कार ’, ‘कलम-रत्न सन्मान पुरस्कार’ आणि ‘ निर्भीड पत्रकारिता सन्मान पुरस्कार’ प्रदान करण्यात येणार आहेत.पुरस्कारासाठी इच्छुक पत्रकार,संपादक आणि डिजिटल मीडिया प्रतिनिधींनी आपली वैयक्तिक माहिती,कार्याचा संक्षिप्त परिचय आणि छायाचित्र दिनांक 15 जून, 2026 पर्यंत आर्यारवी एंटरटेनमेंट, 7/52, दिग्विजय मिल चाळ, दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी, ।मुंबई – 400033. भ्रमणध्वनी: 9082293867 / 8879810298.या संस्थेकडे पाठवावे,असे आवाहन संस्थापक महेश्वर तेटांबे यांनी केले आहे. सदर पुरस्कार वितरण सोहळ्याची तारीख व स्थळ याबाबतची माहिती कार्यक्रमाच्या पंधरा दिवस अगोदर कळविण्यात येणार असल्याची नोंद घ्यावी,असेही आयोजकांनी स्पष्ट केले आहे.अधिक माहितीसाठी खालील समन्वयक यांच्याकडे संपर्क साधावा..गुरुनाथ तिरपणकर (पत्रकार) – 9323662619,राहुल खरात (पत्रकार) - 8308809754 ,केतन भोज (पत्रकार) - 8369554418









**व्यसनमुक्त जनक श्री दिलीप किसनराव आमले आपला माणूस यांच्या विशेष प्रयत्नांतुन फुटपाथ सुरक्षिततेसाठी नवी मुंबई महानगरपालिकेची तात्काळ कार्यवाही व्यसनमुक्ती जनजागृती तथा शिव वाहतूक सेना नवी मुंबई जिल्हाध्यक्ष आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले यांनी विक्रम हॉटेल परिसर, सी.यू.व्ही. सोसायटी, शिव पाम बीच टॅक्सी स्टँड, त्रिमूर्ती वाचनालय तसेच जेष्ठ नागरिक बैठक व्यवस्था परिसरातील फुटपाथवरून सुरू असलेल्या टू-व्हीलर वाहनांच्या धोकादायक वर्दळीबाबत तीन ते चार वेळा अधिकृत लेखी पत्रव्यवहार करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते.या निवेदनाची तात्काळ दखल घेत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वार्ड अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त आणि संबंधित कर्मचाऱ्यांनी संबंधित ठिकाणी लोखंडी पाईप (बोलार्ड) बसवून फुटपाथ सुरक्षित केला.या उपाययोजनेमुळे जेष्ठ नागरिक, महिला, गरोदर स्त्रिया तसेच शाळकरी मुलांना सुरक्षितपणे चालता येणार असून अपघाताचा धोका कमी झाला आहे. नागरिकांकडून नवी मुंबई महानगरपालिकेच्या तातडीच्या कार्यवाहीचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.**

**( दैनिक युवक आधार )**

## अभिनेत्री चैताली भस्मे पत्रकार संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसानिमित्त व विविध मान्यवरांच्या सत्कार सोहळा प्रसंगी पहेला येथे उपस्थित राहणार

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा :** तालुक्यातील पहेला येथे प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या ९ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता होणाऱ्या वाढदिवसानिमित्त व गुणवंत विद्यार्थी सत्कार व विविध मान्यवरांच्या सत्कार समारंभ प्रसंगी अभिनेत्री चैताली भस्मे



उपस्थित राहणार आहेत. चैताली भस्मे यांनी मराठी चित्रपट भाला माणूस , गागरा, साथ तुझा भेटला, उंच भरारी, दिव्य नगाजी, भारत सारथी या चित्रपटात काम केलेले आहे. त्याचप्रमाणे हिंदी शॉर्ट फिल्म दद्दू ,मीठा पाणी ,विद्या, येथे काम केले . व मराठी शॉर्ट फिल्म लक्ष्मीपूजन ,लक्ष्मी आली घरा, दे रे देवा तुझ्या पत्ता इत्यादी ठिकाणी काम केलेले आहे.

## कल्याणमध्ये अग्निशमन दलाची गाडी नाल्यात अडकली

### वादळानंतर अरुंद रस्त्यांमुळे मदतकार्यात अडथळा

**दैनिक युवक आधार**

**कल्याण :** वादळी वाऱ्यांमुळे कल्याणमध्ये अनेक ठिकाणी झाडे कोसळली असून, रस्ते मोकळे करण्याचे प्रयत्न सुरू होते. मात्र, अरुंद रस्ते आणि जुन्या भागांतील अतिक्रमणांमुळे बचावकार्यात अडथळा आला. झाड हटवण्यासाठी निघालेली एक मोठी अग्निशमन गाडी टिळक चौक परिसरातील नाल्याच्या झाकणात अडकली. गाडी बाहेर काढण्यासाठी अग्निशमन दलाच्या जवानांना मोठी कसरत करावी लागली. अखेरीस, जेसीबीच्या मदतीने ती गाडी



नाल्यातून यशस्वीपणे बाहेर काढण्यात आली. या घटनेनंतर नागरिकांनी संताप व्यक्त केला असून, आपत्कालीन परिस्थितीत शहराच्या रस्ते नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

# उरणमध्ये ‘सम-विषम पार्किंग’ नियम लागू; नियमभंगास दंड

**दैनिक युवक आधार**

**सायली साळुंके/उरण प्रतिनिधी :** उरण शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अखेर प्रशासनाने ठोस पाऊल उचलले आहे. नवी मुंबई पोलीस आणि उरण वाहतूक शाखेच्या संयुक्त विद्यमाने शहरात ‘सम-विषम तारखेनुसार पार्किंग’ पद्धत लागू करण्यात आली आहे. या निर्णयामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवरील बेशिस्त पार्किंगला आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

उरण नगरपालिकेच्या वतीने शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर सम आणि विषम तारखांचे पार्किंग दर्शविणारे फलक लावण्यात आले आहेत. नागरिकांनी या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन वाहतूक शाखेकडून करण्यात आले आहे.

नव्या नियमानुसार, सम तारखांच्या दिवशी (२, ४, ६, ८, १०, १२, १४, १६, १८, २०, २२, २४, २६, २८, ३०) केवळ ‘सम’ फलक असलेल्या बाजूला वाहन पार्क करण्यास परवानगी असेल. त्याचप्रमाणे, विषम तारखांच्या दिवशी (१, ३, ५, ७, ९, ११, १३, १५, १७, १९, २१, २३, २५, २७, २९, ३१) ‘विषम’ फलक असलेल्या बाजूला पार्किंग करता येईल.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये



दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. फलक नसलेल्या ठिकाणी किंवा चुकीच्या दिवशी पार्किंग केल्यासही कारवाई होणार आहे. उरण शहरातील अरुंद रस्ते आणि वाढती वाहनसंख्या यामुळे वारंवार वाहतूक कोंडी होत होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभ्या केल्या जाणाऱ्या वाहनांमुळे रुग्णवाहिका, बस आणि अन्य आपत्कालीन सेवांना अडथळा निर्माण होत होता. या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

सम-विषम पार्किंग प्रणालीमुळे रस्त्याच्या एका बाजूला वाहने उभी राहतील आणि दुसरी बाजू वाहतुकीसाठी मोकळी राहील, त्यामुळे कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. नागरिकांनी नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

# दहावीच्या निकालात मुलींची बाजी, पण वाशिम जिल्हा पिछाडीवर

### गतवर्षी 95 .41 टक्के असलेला निकाल यंदा 88 .04 टक्क्यांवर ; अमरावती विभागात जिल्हा शेवटच्या स्थानी

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या दहावी परीक्षेच्या निकालात वाशिम जिल्ह्याची कामगिरी निराशाजनक ठरली आहे. गतवर्षी अमरावती विभागात उल्लेखनीय यश संपादन करत दुसऱ्या क्रमांकावर झेपावलेल्या वाशिम जिल्ह्याचा यंदा निकाल थेट शेवटच्या स्थानी घसरला आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

गतवर्षी जिल्ह्याचा एकूण निकाल 95.41 टक्के इतका होता. मात्र यंदा तो 88.04 टक्क्यांवर येऊन ठेपला असून तब्बल 7.37 टक्क्यांची घसरण नोंदविण्यात आली आहे. जिल्ह्याच्या निकालातील ही घसरण पालक, शिक्षक आणि शिक्षण विभागासाठी धक्कादायक मानली जात आहे. अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा निकाल अपेक्षेपेक्षा कमी लागल्याने शैक्षणिक गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

तालुकानिहाय निकालात रिसोड तालुक्याने 92.75 टक्के निकालासह जिल्ह्यात अव्वल स्थान पटकावले. कारंजा तालुका 90.79 टक्क्यांसह दुसऱ्या क्रमांकावर राहिला. वाशिम तालुक्याचा निकाल 87.57 टक्के, मालेगावचा 87.41 टक्के तर मंगरूळपीरचा 85.14 टक्के लागला. मानोरा तालुक्याचा निकाल केवळ 79.22 टक्के लागल्याने तो जिल्ह्यात सर्वात मागे राहिला.




दरम्यान, यंदाच्या निकालात मुलींनी पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. अनेक विद्यार्थिनींनी उच्च गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. मुलींच्या यशामुळे जिल्ह्याची शैक्षणिक परंपरा कायम राहिली असली तरी एकूण निकालातील घसरण ही चिंतेची बाब ठरत आहे.

शिक्षणतज्ज्ञांच्या मते, ग्रामीण भागातील शैक्षणिक सुविधा, शिक्षकांची कमतरता, विद्यार्थ्यांवरील वाढता ताण तसेच अभ्यासातील सातत्याचा अभाव यांसारख्या कारणांमुळे निकालावर परिणाम झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आगामी काळात विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी विशेष शैक्षणिक उपक्रम राबविण्याची गरज व्यक्त होत आहे.

दरम्यान, यशस्वी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, अपयशी विद्यार्थ्यांनी खचून न जाता पुढील संधीसाठी अधिक जोमाने तयारी करावी, असे आवाहन शिक्षक व पालकांकडून करण्यात येत आहे.

# समाजएकता आणि जनकल्याणासाठी महान व्यक्तींच्या कार्याचा आदर्श महत्वाचा - लोकनेते रामशेठ ठाकूर









**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : कर्मवीर अण्णा, एन. डी. पाटील, दि. बा. पाटील, जनार्दन भगत साहेब या सर्वांनी समाजहिताच्या दृष्टिकोनातून प्रचंड मेहनत घेतली. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढील पिढीला दिला पाहिजे आणि त्याच मार्गाने वाटचाल केली पाहिजे. त्यामुळे समाजात एकता, प्रगती आणि जनकल्याणाची भावना अधिक दृढ होईल, असे मत थोर दानशूर व्यक्तिमत्व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उलवे नोड येथे केले.

कष्टकऱ्यांचे द्रष्ट नेते थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३८ व्या पुण्यतिथी निमित्ताने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षण, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या संस्था आणि व्यक्तींचा गुणगौरव, नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा सत्कार तसेच पनवेल तालुकास्तरीय "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२६" पारितोषिक वितरण समारंभ उलवे नोड मधील रामशेठ ठाकूर मैदानावर भव्य स्वरूपात आणि समारंभपूर्वक जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. त्यावेळी मार्गदर्शन करताना बोलत होते. या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून भगतसाहेबांच्या कन्या व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, महापौर नितीन पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अरुणशेठ भगत, दिबासाहेबांचे चिरंजीव अतुल पाटील, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव नगरसेवक परेश ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, ज्येष्ठ नेते जयंत पगडे, संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे, संचालक अनिल भगत, प्रकाश भगत, संजय भगत, अजय भगत, रत्नप्रभा घरत, भाऊशेठ पाटील, वसंत पाटील, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, पनवेल महापालिकेचे सभागृहनेते प्रकाश बिनेदार, ॲड. राहुल घरत यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

या सोहळ्याच्या निमित्ताने पनवेल महापालिकेचे नवनिर्वाचित रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, पनवेल पंचायत समिती सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील तसेच पनवेल व उरण तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांचा सत्कार करण्यात आला. थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत साहेबांच्या स्मृतीप्रित्यर्थ देण्यात येणाऱ्या सर्वोत्कृष्ट स्वच्छ ग्रामपंचायतीचा सन्मान यंदा करंजाडे ग्रामपंचायतीने पटकावला. त्यांना ०१ लाख रुपये व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले"स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२६ स्पर्धेत द्वितीय क्रमांक पळस्पे ग्रामपंचायत (५० हजार रुपये व सन्मानचिन्ह), तृतीय क्रमांक पालेबुद्रुक ग्रामपंचायत (२५ हजार रुपये व सन्मानचिन्ह) तर उत्तेजनार्थ बक्षिस शिवकर ग्रामपंचायत आणि नेरे ग्रामपंचायतीने (प्रत्येकी ११ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह) पटकावले. तसेच गव्हाण ग्रामपंचायत अंतर्गत ग्राम स्वच्छता पुरस्कार स्पर्धेत प्रथम क्रमांक शेलघर (५० हजार रुपये ), द्वितीय क्रमांक शिवाजीनगर (२५ हजार रुपये) तर तृतीय क्रमांक कोपर गावाला (१५ हजार रुपये) मिळाला. तसेच कला, क्रीडा, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय आणि अभिमानास्पद कामगिरी करणाऱ्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेतील विविध शाखांचा आणि विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभही संपन्न झाला. यावेळी 'द फोक मराठी' हा सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात मराठी लोककलेचे विविध प्रकार सादर करण्यात आले. कार्यक्रमात सहभागी कलाकारांनी उत्कृष्ट सादरीकरण करून मराठी संस्कृतीचे सुंदर दर्शन घडवले.

**यावेळी स्व. जनार्दन भगत साहेबांच्या जीवनावरील आढावा घेणारी चित्रफीत प्रदर्शित करण्यात आली. तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या अर्थात अमृतमहोत्सवी वर्ष वाढदिवसानिमित्त त्यांच्या जीवनावर निर्मित करण्यात आलेल्या 'रामपर्व' या डॉक्युमेंटरीचे अनावरण चिरंजीव आमदार प्रशांत ठाकूर व नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.**

जनार्दन भगत साहेबांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अफाट राहिले असून त्यांनी अहोरात्र लोकांची सेवा केली. आयुष्यापेक्षा ध्येय्य मोठे असले पाहिजे, ही शिकवण त्यांनी समाजामध्ये रुजवत फक्त राजकारण नाही तर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांनी विभागातील भांडणतंटे दूर करण्याच्या दृष्टिकोनातून देवदूताची भूमिका सुद्धा पार पाडत समाजाला न्याय दिला. भगतसाहेबांनी कुटुंबाला नाही पण समाजाच्या हितासाठी आपले आयुष्य खर्च केले. त्यांच्या मुशीतून राजकीय, सामाजिक चळवळीचे कार्यकर्ते घडविले. त्याचबरोबर बेळगाव सीमा प्रश्नावर त्यांनी एक वर्ष कारावास सोसला आहे. भगतसाहेबांचे कार्य अफाट राहिले आहे, त्यामुळे त्यांचा त्याग आणि त्यांची स्मृती कायम स्मरणात रहावे, यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भगतसाहेबांची जयंती आणि पुण्यतिथी सामाजिक उपक्रमात साजरी केली जाते. जनार्दन भगत साहेब हे नाव उच्चारताच समाजसेवेची एक जाज्वल्य ज्योत डोळ्यांसमोर उभी राहते. आयुष्याला केवळ जगण्याचा नाही, तर घडवण्याचा अर्थ त्यांनी दिला. "ध्येय हेच आयुष्यापेक्षा मोठे असते" हा त्यांचा संदेश आजही असंख्य हृदयांना दिशा देतो. त्यांनी सत्ता नव्हे, तर माणसं जिंकली. राजकारणाच्या पलीकडे जाऊन त्यांनी समाजकारण आणि शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तनाची बीजे रोवली. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या उदात्त विचारासाठी त्यांनी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले. त्यांच्या प्रत्येक श्वासात तळागाळातील माणसांविषयीची करुणा आणि आपुलकी होती. भुकेची वेदना त्यांनी केवळ पाहिली नाही, तर ती स्वतःच्या अंतःकरणात अनुभवली. शिक्षण हेच परिवर्तनाचं खरं शस्त्र आहे, यावर त्यांचा अढळ विश्वास होता. म्हणूनच त्यांनी समाजाला केवळ आधार नाही, तर उभं राहण्याची ताकद दिली. दूरदृष्टी, अथक परिश्रम, अढळ चिकाटी आणि समाजहिताची तळमळ या गुणांनी त्यांचं व्यक्तिमत्त्व असामान्य बनवले. पनवेलसाठी ते आधारवड आणि देवदूत ठरले. आज ते आपल्यात नसले, तरी त्यांचे विचार, त्यांची प्रेरणा आणि त्यांची कार्यपद्धती प्रत्येकाच्या मनात जिवंत आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त दर चार वर्षांनी त्यांच्या कार्याची उजळणी करत समाजात उल्लेखनीय काम करणाऱ्यांना सन्मानित केलं जातं.

तसेच, दरवर्षी त्यांच्या पुण्यतिथीला विविध सामाजिक उपक्रमांद्वारे त्यांच्या स्मृतींना वंदन केले जाते. जनार्दन भगत साहेब हे केवळ एक व्यक्तिमत्त्व नव्हते ते एक विचार होते, एक प्रेरणा होते आणि ती प्रेरणा कायम स्मरणात राहून वाटचाल करत राहू या अशा भावना उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणात व्यक्त करत भगतसाहेबांना आदरांजली वाहिली.

## निफाड आश्रम शाळेचे एस. एस.सी. परीक्षेत घवघवीत यश

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : मातोश्री जसोदाबाई सोनी प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, निफाड येथील विद्यार्थ्यांनी एस.एस. सी. परीक्षा फेब्रुवारी/मार्च 2026 मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले असून शाळेचा निकाल तब्बल 92.45 टक्के लागला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या परीक्षेत वेणू अंबादास डोळे हिने 67.40 टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. निलेश परशराम बाम्हने याने 66.00 टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. केतन अशोक भोये याने 64.60 टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. पूजा मोहन दळवी हिने 64.40 टक्के गुणांसह चौथा क्रमांक, तर वर्षा लक्ष्मण गवळी हिने 64.20 टक्के गुण मिळवत पाचवा क्रमांक मिळविला.

याशिवाय परीक्षेत 14 विद्यार्थी प्रथम श्रेणीत, 34 विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर 1 विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत यशस्वी झाला.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ शेलार, सर्व विश्वस्त मंडळ, ज्ञानदेव ढोमसे (माध्यमिक मुख्याध्यापक), नितीन कडलग (प्राथमिक मुख्याध्यापक), अधीक्षक, अधीक्षिका, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## पनवेल तालुका पोलीस ठाण्यात महिला दक्षता समिती मासिक बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे हद्दीतील महिला दक्षता समिती सदस्य यांची मासिक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला वपोनि गजानन घाडगे व पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र म्हात्रे यांनी विशेष मार्गदर्शक तसेच सूचना केल्या त्यामध्ये महिला/ मुली यांची सुरक्षा यावर चर्चा/ मार्गदर्शन केले. सायबर क्राईम, नशा मुक्ती चर्चा / मार्गदर्शन व सदर बाबत माहिती मिळाल्यास डायल 112 सकाळ संपर्क करणे. शाळा /कॉलेज येथे विद्यार्थीनी यांचे सुरक्षेच्या दृष्टीने





महिला वार्डन नेमणे बाबत. उपस्थित शिक्षिका- महिला दक्षता सदस्य यांना सूचना केली आहे. महिला सक्षमीकरण, महिलांचे अडीअडचणी , तक्रारी या करिता पोलीस ठाण्यात महिला पोलीस अधिकारी व महिला पोलीस अंमलदार यांची नेमणूक करण्यात आलेली आहे त्यांची माहिती देण्यात आलेली आहे. महिला दक्षता समिती सदस्य यांच्या अडीअडचणी ऐकून त्यांच्या समस्येचे निराकरण करण्यात आलेले आहे . सदर बैठकीत महिला दक्षता समिती सदस्य व प्रतिष्ठित महिला उपस्थित होत्या.

## सामाजिक क्रांतीची मशाल तेवत ठेवणारे लोकल्याणकारी राजे - डॉ रेवाराम खोब्रागडे

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी - मुरमाडी / सावरी** : येथील महाप्रज्ञा बुद्ध विहारात राजश्री शाहू महाराज यांचा स्मृतीदिन कार्यक्रमा अंतर्गत अभिवादन करण्यात आले.



1894 साली राज्यसूत्रे धारण केल्यापासून ते 1922 दिवंगत होईपर्यंत सामाजिक क्रांतीची मशाल त्यांनी प्रतिगामी शक्ती आणि सनातनी व्यक्ती यांच्याशी झुंज देऊन प्रज्वलित केली हे क्रांतीकार्य पार पाडत असताना त्यांना प्रखर टीकेच्या अग्नी दिव्यातून जावे लागले केवळ कोल्हापूर नव्हे संपूर्ण महाराष्ट्र महाराजांनी राजसूत्रे धारण केली आणि अन्यायाविरुद्ध बंड पुकारले ज्या सामाजिक, शैक्षणिक ,सांस्कृतिक आणि धार्मिक राजकीय चळवळी केल्या .


त्या थोर पुरुषांच्या अपेक्षा त्यांनी फलद्रूप केल्या. अस्पृश्यता निवारण ,मोफत सक्तीचे प्राथमिक शिक्षण, विद्यार्थी वस्तीगृहांची अभूतपूर्व योजना ,धरणे बांधून हरितक्रांतीच्या दिशेने वाटचाल त्यामूळे सामजिक क्रांतीची मशाल तेवत ठेवणारे लोकल्याणकारी राजे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमूख वक्ते डॉ रेवाराम खोब्रागडे यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेंद्र बनसोड यांनी कार्य आणि विचार सांगितले यावेळी उपस्थित वी ग कांबळे, गजेन्द्र गजभिये, सदानंद वासनिक, किशोर बनसोड, रमेश भोयर, कमल गणवीर, साधना शिंगाडे, लीला भिमटे, सरिता काणेकर, वर्षा तिरपुडे, उपस्थित होते

## जागतिक थॅलेसेमिया दिनानिमित्त श्रीवर्धनमध्ये जनजागृती कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी -अनिकेत मोहित** : जागतिक थॅलेसेमिया दिन निमित्त श्रीवर्धन येथील श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालय येथे थॅलेसेमिया विषयक विशेष जनजागृती व प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम श्रीवर्धन डॉक्टर असोसिएशन तसेच श्रीवर्धन व्यापारी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला.

कार्यक्रमामध्ये थॅलेसेमिया हा रक्तातील अनुवंशिक आजार असून तो आई-वडिलांकडून बाळामध्ये संक्रमित होऊ




शकतो, याबाबत उपस्थितांना सविस्तर माहिती देण्यात आली. दोन थॅलेसेमिया मायनर स्त्री-पुरुषांचा विवाह झाल्यास त्यांच्या पोटी थॅलेसेमिया मेजर बालक जन्माला येण्याची शक्यता असते. अशा बालकांना दर २१ दिवसांनी बाहेरून रक्त द्यावे लागते, असे तज्ज्ञांनी स्पष्ट केले.समाजामध्ये थॅलेसेमियाबाबत जनजागृती निर्माण व्हावी आणि भविष्यात थॅलेसेमिया मुक्त समाज घडावा या उद्देशाने महाड जनकल्याण रक्त केंद्र यांच्या वतीने रायगड जिल्ह्यात विशेष जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे.

या कार्यक्रमास श्रीवर्धन जनजागृती समितीच्या संयोजिका मॅडम, समिती सदस्य श्री. बाळा वाणी, रायगड जिल्हा समन्वयक श्री. अविनाश घोलप तसेच उपजिल्हा रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातून थॅलेसेमिया तपासणी व जनजागृतीचे महत्त्व नागरिकांसमोर अधोरेखित करण्यात आले.


# धारावीत १२ मे ला जनगणना मार्गदर्शन सभा

## वीरशैव कक्कया कल्याण मंडळाचा पुढाकार

**दैनिक युवक आधार**

**मुबंई वार्ताहर :** महाराष्ट्र राज्यात१ मे २०२६ पासून सुरू झालेल्या पहिल्या चरणातील जनगणना प्रक्रियेबाबत समाज बांधवांना सविस्तर माहिती मिळावी यासाठी वीरशैव कक्कया कल्याण मंडळाने 'मार्गदर्शन सभे'चे आयोजन केले आहे.

मंगळवार १२ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता श्री गणेश विद्यामंदिर हायस्कूल, नवीचाळ,संत कक्कया मार्ग,धारावी येथे ही सभा होणार आहे.मंडळाचे प्रवक्ते श्री.रवींद्र रूपचंद शिंदे जनगणना फॉर्म भरण्याची पद्धत,आवश्यक कागदपत्रे व कक्कया समाजाची अचूक नोंद करण्याबाबत मार्गदर्शन करणार आहेत.



"जनगणनेत अचूक नोंद झाली तरच शासकीय योजनांचा लाभ मिळेल," असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष महादेव कृष्णा शिंदे व सचिव यशवंत नारायणकर यांनी केले आहे. सर्व समाज बांधवांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, अशी विनंती करण्यात आली आहे.मंडळाने दिलेल्या माहितीनुसार अशाच चर्चा सत्रांचे आयोजन उर्वरित जिल्हा पातळीवरही करण्याचा मानस आहे.

# आदिवासींच्या शाश्वत विकासासाठी शासन कटिबद्ध;

## शहापूर येथील शबरी लाभार्थी संवाद मेळाव्यात नामदार डॉ. अशोक वुईके यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी :** आदिवासी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन पूर्णतः कटिबद्ध असून, शबरी महामंडळाच्या विविध कर्ज व कौशल्य विकास योजनांचा लाभ तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकास मंत्री मा. प्रा. डॉ. अशोक वुईके यांनी केले.



आदिवासी विकास विभाग अंतर्गत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक मार्फत शहापूर येथील आत्मामलिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये 'लाभार्थी संवाद मेळावा व विविध योजना आढावा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, या प्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. या कार्यक्रमाला शबरी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालिका मा. श्रीमती लीना बनसोड आणि महाव्यवस्थापक मा. जयरेखा निकुंभ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना आदिवासी विकास आयुक्त तथा शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांनी, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ द्वारे देण्यात येणाऱ्या लाभामुळे अनेक लाभार्थ्यांच्या आयुष्यात आमूलाग्र बदल झाल्याचं बघायला मिळत आहे. या प्रकारच्या मेल्याव्यांमुळे इतर लाभार्थ्यांना देखील प्रेरणा मिळत आहे. यापुढे असे मेळावे यांचे नियोजन लाभार्थ्यांच्या बांधावर जाऊन करण्याचे नियोजन असल्याने सांगितले.

या मेळाव्यात 'एकलव्य कुशल योजने' अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सात उमेदवारांना प्रतिनिधिक स्वरूपात मान्यवरांच्या हस्ते विविध नामांकित कंपन्यांची नियुक्ती पत्रे (Job Letters) प्रदान करण्यात आली. यामुळे आदिवासी तरुणांच्या हाताला थेट रोजगार मिळाल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान विविध योजनांच्या लाभार्थ्यांनी आपले अनुभव अतिशय ओघवत्या भाषेत मांडले. यामध्ये वैभव ढिवरे, नेहा भोईर, यशस्वी शेतकरी गटाचे रामचंद्र भुसारा, चिपळूणचे चंद्रकांत जाधव आणि कायापालट वनधन केंद्राच्या अध्यक्षा श्रावणी वाख यांनी महामंडळाच्या योजनांमुळे त्यांच्या आयुष्यात कसा सकारात्मक बदल झाला, याबद्दल माहिती दिली.यावेळी विशेष केंद्रीय सहाय्य योजना आणि वनधन विकास केंद्रांच्या माध्यमातून दुर्गम भागात राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि उपस्थितांचे आभार महाव्यवस्थापक मा. जयरेखा निकुंभ यांनी मानले. या मेळाव्याला शहापूर, भिवंडी, मुरबाड आणि चिपळूण तालुक्यातील आदिवासी बांधव, लाभार्थी आणि अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रामीण कलेचा सन्मान! अलिबागच्या पीएनपी नाट्यगृहात १८ मे पासून 'नाट्यप्रभा' महोत्सवाचा जागर!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील नाट्य संस्कृती ही आपल्या मातीची खरी ओळख आहे. गावागावात जपलेली ही परंपरा केवळ मनोरंजनापुरती मर्यादित नसून ती समाजाचा संघर्ष आणि वास्तव मांडणारे प्रभावी माध्यम आहे. याच ग्रामीण रंगभूमीला नवसंजीवनी देण्यासाठी आणि कलावंतांना व्यावसायिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी पीएनपी कलाविकास मंडळाच्या वतीने 'नाट्यप्रभा ग्रामीण महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. १८ मे पासून अलिबागच्या पीएनपी नाट्यगृहात या महोत्सवाचा पडदा उघडणार आहे.




**अनुदान आणि तिकीट पद्धतीचा अनोखा उपक्रम**

ग्रामीण कलाकारांना व्यावसायिक नाटकांप्रमाणेच दर्जेदार अनुभव मिळावा, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. ज्या रंगमंचावर दिग्गजांनी आपली छाप पाडली, तिथे सादरीकरण करण्याची संधी या कलाकारांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. विशेष म्हणजे, या महोत्सवात प्रत्येक नाटकाला अनुदान देण्यात येणार असून, नाटके तिकीट पद्धतीवर सादर केली जातील. 'आपलं नाटक तिकिटावर लागणं' ही कोणत्याही कलाकारासाठी अभिमानाची गोष्ट असते, हीच भावना जपण्यासाठी नाममात्र देणगी मूल्यात तिकिटे उपलब्ध असतील. त्यातून जमा होणारा संपूर्ण निधी थेट संबंधित नाट्यमंडळांना देऊन कलाकारांना आर्थिक बळ दिले जाणार आहे.

नाटकाची गुणवत्ता वाढावी यासाठी तज्ज्ञ कलाकारांचे मार्गदर्शन आणि आवश्यक सहकार्य या महोत्सवात दिले जाणार आहे अलिबाग मधील जेष्ठ कलाकारांसह नेहमीच कलावंतांच्या पाठीशी उभ्या राहणाऱ्या मान. चित्रलेखा ताई पाटील यांचा या महोत्सवाला मोठा हातभार लाभला आहे. महोत्सव यशस्वी करण्यासाठी कार्याध्यक्ष प्रतीक पानकर ,ग्रामीण रंगभूमीचे अध्यक्ष राजन पांचाळ ,देवेंद्र केळुसकर ,अभिनेते दिग्दर्शक सागर नार्वेकर ,यांच्यासह संचित पानसरे ,तनवी पाटील ,उपासना घोसाळकर, प्रमोद पाटील, नितेश पाटील ,ऋषिकेश पडवळ, रवींद्र पाटील, अस्मिता बारसे, संकल्प केळकर, जितेंद्र पाटील, तुषार पाटील ,आरती पाठक ,हिमाचल चोरगे ,अमोल मिठाग्री, दीपक काळेल ,अनिस मिठाग्यरी,मयूर मोरे ,साहिल पाटील, यश बनसोडे आणि त्यांचे सर्व सहकारी अहोरात्र मेहनत घेत आहेत ."आम्ही केवळ चर्चा करत नाही तर कृती करतो हे दाखवून देण्याची वेळ आहे ही, रंगदेवतेची पालखी आहे ,आणि आपण सर्वांनी तिचे खांदेकरी व्हायचे आहे ."असे आवाहन आयोजकांनी केले आहे. ग्रामीण रंगभूमीच्या या पताका उंचावण्यासाठी जास्तीत जास्त रसिकांनी उपस्थित राहून कलाकारांना प्रोत्साहन द्यावी अशी विनंती करण्यात आली आहे.

# उरण नगरपरिषदेच्या 'माँ साहेब मीनाताई ठाकरे वाचनालय'

## अभ्यासिकेच्या विद्यार्थ्याची नवी मुंबई पोलीस दलात निवड

**दैनिक युवक आधार**

महाराष्ट्र प्रतिनिधी : उरण नगरपरिषद संचलित माँ साहेब मीनाताई ठाकरे वाचनालय येथील अभ्यासिकेत अभ्यास करणाऱ्या कु. श्रीकांत सांगोलकर या विद्यार्थ्याची नवी मुंबई पोलीस दलात नवीमुंबई पोलीस पदी निवड झाल्याबद्दल नगराध्यक्ष भावनाताई घाणेकर यांच्या हस्ते श्रिकांतचा सत्कार करण्यात आला. सदर अभ्यासिका तत्कालीन जिल्हाधिकारी मा. श्री. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून चार वर्षांपूर्वी सुरू करण्यात आली होती. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून *श्रीकांत सांगोलकर* याने हे यश संपादन केले आहे.



विशेष म्हणजे, या अभ्यासिकेतील विद्यार्थ्याने मिळविलेले हे 10 वे यश आहे. यापूर्वीही या अभ्यासिकेतील यापूर्वी 9 विद्यार्थी एमपीएससी, पोलीस, तलाठी, मुंबई महापालिका, खाजगी कंपन्या , अशा विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी झाले आहेत. श्रीकांतच्या या निवडीमुळे अभ्यासिकेत अभ्यास करणाऱ्या इतर विद्यार्थ्यांमध्ये अधिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे

श्रिकांत याने आपले मनोगत व्यक्त करताना उरणमधील ही एकमेव अभ्यासिका आहे तीथे आम्हाला वेळेचे बंधन नाही त्यामुळे शहरी तसेच ग्रामीण भागातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना मोफत अभ्यासाची सुविधा उपलब्ध करून देण्याचा नगरपरिषदेचा उद्देश सफल होत असल्याची भावना यावेळी व्यक्त करताना ग्रंथपाल संतोष पवार, सहाय्यक जयेश वत्सराज यांचे योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी ॲड निरंतर सावंत यांनी श्रिकांतला मार्गदर्शन करताना सांगीतले आता थांबायचे नाही.

यावेळी सहाय्यक ग्रंथपाल जयेश वत्सराज यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून हे यश मिळविले आहे असे मत व्यक्त केले, ग्रंथपाल संतोष पवार यांनी श्रिकांतची जीद्द , चिकाटी आणि परिस्थितीवर मात करण्याची प्रबळ इच्छेच्या जोरावर श्रिकांतने हे यश मिळविले आहे याबाबत वाचनालयाच्या वतीने श्रिकांत आणि त्याच्या सतत पाठिशी खंबीरपणे पाठीशी उभे राहणाऱ्या आई बाबांचा सन्मान करण्यात आला.

या यशाबद्दल उरण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ. भावना घाणेकर यांनी श्रीकांत सांगोलकर याचे अभिनंदन केले व त्याच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच अभ्यासिकेस मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांचेही त्यांनी कौतुक केले. आणि अभ्यासिकेत सातत्याने अभ्यास करणार्या सर्व विद्यार्थ्यांच्या सर्व समस्या सोडविण्यासाठी मी प्रयत्न करणार नगरपरिषदेमार्फत यापुढेही विद्यार्थ्यांसाठी इन्व्हर्टर व ईतर सुविधा अधिक सक्षमपणे पुरविल्या जातील, अशी ग्वाही नगराध्यक्षा सौ. घाणेकर यांनी दिली.

# गावागावात LED चित्ररथाद्वारे समाजकल्याण योजनांची जनजागृती

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे :** समाजकल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हा परिषद अंतर्गत विशेष सहाय्य विभागामार्फत LED चित्ररथाच्या माध्यमातून जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत गावागावात जाऊन योजनांची माहिती प्रसारमाध्यमांद्वारे व चित्रफितींच्या माध्यमातून नागरिकांना दिली जाणार आहे.

सहाय्यक आयुक्त समाजकल्याण नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून, सामाजिक न्याय भवन नांदेड यांच्या माध्यमातून विविध योजनांची प्रसिद्धी करण्यात येणार आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश तळागाळातील व बहुजन समाजातील नागरिकांपर्यंत शासनाच्या योजनांची माहिती प्रभावीपणे पोहोचवणे हा आहे.



तसेच समाजकल्याण विभागाच्या एकूण २७ योजनांची माहिती चित्ररथाद्वारे प्रसारित केली जाणार असून, नागरिकांच्या समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी दर तीन महिन्यांनी लोकसंवाद कार्यक्रमही आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. यामध्ये रमाई आवास योजना यासह विविध योजनांचा समावेश आहे.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या योजनांची सविस्तर माहिती मिळून त्याचा लाभ घेणे अधिक सोपे होणार आहे.

# सिल्लोडमध्ये 'वीरपुत्रा'चे जल्लोषी स्वागत !

## २२ वर्षांच्या प्रदीर्घ देशसेवेनंतर सीआरपीएफ जवान दिलीप चंदन निवृत्त; भव्य मिरवणुकीने शहर दुमदुमले

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर :** भारतीय सैन्य दलात (सीआरपीएफ) सलग २२ वर्षे खडतर कर्तव्य बजावून सेवानिवृत्त झालेले तळणी (ता. सिल्लोड) येथील सुपुत्र दिलीप पुंजाराम चंदन यांचे शहरात आगमन होताच नागरिकांच्या वतीने अभूतपूर्व स्वागत करण्यात आले. तिरंगा ध्वज आणि फुलांनी सजवलेल्या वाहनातून काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीने संपूर्ण शहर 'भारत माता की जय'च्या जयघोषाने दुमदुमले.

दिलीप चंदन हे २००४ मध्ये केंद्रीय राखीव पोलीस दलात (CRPF) भरती झाले होते. आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी जम्मू-काश्मीर, छत्तीसगड, झारखंड, नागालँड आणि महाराष्ट्रातील नक्षलग्रस्त गडचिरोली यांसारख्या अतिसंवेदनशील राज्यांत देशसेवा केली. ३० एप्रिल रोजी ते सेवानिवृत्त होऊन मायदेशी परतले. शहरात आगमन होताच त्यांनी सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या सेवापूर्ती सोहळ्यानिमित्त उपनगराध्यक्ष विठ्ठलराव सपकाळ,



माजी सैनिक बबनराव वाघ, सामाजिक कार्यकर्ते कृष्णा वाघ, दिलीप वाघ, रत्नाकर वाघ आदींच्या प्रमुख उपस्थितीत चंदन यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. महिलांनी त्यांचे औक्षण केले, तर उपस्थितांनी गुलाबाच्या फुलांची उधळण करत त्यांचे स्वागत केले.

शिवाजी महाराज पुतळ्यापासून सुरू झालेली मिरवणूक शहरातील मुख्य चौकांतून काढण्यात आली. ठिकठिकाणी व्यापारी, प्रतिष्ठित नागरिक आणि विविध संघटनांच्या वतीने त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. शिक्षक कॉलनी व बालाजीनगर येथील त्यांच्या निवासस्थानी या सोहळ्याची सांगता झाली. यावेळी राजु अपार, नंदकुमार जाईबहार, हेमंत मोहिते, मनोज लिंगायत, हरिश्चंद्र मोहिते, मधुकर घेनेकर यांच्यासह आजी-माजी सैनिक, नातेवाईक व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तळोजा कारागृहातील न्यायबंदीचा उपचारादरम्यान मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई वार्ताहर :** तळोजा मध्यवर्ती कारागृहातील एका न्यायबंदीचा मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. लक्ष्मण ढाकु वाघमारे (वय ६६, रा. भिवंडी, ठाणे) असे मृत न्यायबंदीचे नाव आहे. खालापूर पोलीस ठाण्यात २०२१ मध्ये दाखल खून प्रकरणात वाघमारे हे



तळोजा कारागृहात न्यायबंदी म्हणून ठेवण्यात आले होते. त्यांना टीबीचा त्रास होत असल्याने १२ मार्च २०२६ रोजी उपचारासाठी सर जे.जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना १२ एप्रिल रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मृत्यूची माहिती मिळाल्यानंतर सर जे.जे. मार्ग पोलीस ठाण्यात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९४ प्रमाणे आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. कार्यकारी दंडाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामा व व्हिडिओ चित्रीकरण करण्यात आले. शवविच्छेदन अहवालात फुफ्फुसाचा आजार, पल्मोनरी कन्सॉलिडेशन, फॅटी लिव्हर आणि दीर्घकालीन मूत्रपिंड विकारामुळे मृत्यू झाल्याचे प्राथमिक कारण नमूद करण्यात आले असून अंतिम अहवाल हिस्टोपॅथॉलॉजिकल तपासणीनंतर देण्यात येणार आहे. या प्रकरणाची पुढील नोंद खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास सपोनि बाळासाहेब शिंदे करीत आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# अजिंठा-वेरूळच्या पर्यटकांना आता 'क्यूआर कोड'चे सुरक्षा कवच

## मधमाशांचे हल्ले रोखण्यासाठी इद्रीस मुलतानींच्या हस्ते उपक्रमाचे विमोचन; 'हरीत पर्यटना'वर भर

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर** ; सिल्लोड-अजिंठा-वेरूळसह जिल्ह्यातील विविध पर्यटन स्थळांवर मधमाशांचे मानवावर होणारे हल्ले आणि त्यातून उद्भवणारा मानव-वन्यजीव संघर्ष कायमचा निकाली काढण्यासाठी आता आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर सुरू झाला आहे. 'हरीत पर्यटन' आणि पर्यटक सुरक्षेची शास्त्रीय माहिती देणाऱ्या विशेष 'क्यूआर कोड' (QR Code) प्रणालीचे विमोचन महाराष्ट्र भाजप अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी यांच्या हस्ते आज येथे करण्यात आले. प्रत्येक बस, हॉटेल आणि लेणीतील मोक्याच्या ठिकाणी हे स्टिकर्स लावण्यात येणार असून, ते स्कॅन करताच पर्यटकांना बचावात्मक माहिती उपलब्ध होणार आहे.

अजिंठा लेणी परिसरात मधमाशांच्या हल्ल्यांमुळे पर्यटकांच्या संख्येत होणारी घट लक्षात घेऊन, सोयगाव वन विभागाच्या मानव-वन्यजीव संघर्ष समितीचे सदस्य तथा सिल्लोड येथील अभिनव प्रतिष्ठानचे वन्यजीव अभ्यासक डॉ. संतोष पाटील यांनी या विशेष पोस्टर्स व क्यूआर कोडची निर्मिती केली आहे. यामध्ये हल्ल्याची शास्त्रीय कारणे, उपाय आणि प्रतिबंधात्मक बाबींचा सविस्तर समावेश आहे.

मानवी हस्तक्षेपामुळे मधमाशांचा 'आत्मघातकी' बचाव

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. पाटील म्हणाले की, "मधमाशा सर्वच वनस्पतींच्या परागीभवनात व फलनात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. मानवावर हल्ला करताना त्यांचा डंख त्वचेत रुततो व तो न निघाल्याने त्यांची आंत्रसंस्था निकामी होऊन त्यांचा मृत्यू होतो. हा एक प्रकारे त्यांचा आत्मघातकी हल्ला ठरतो आणि यास आपण मनुष्य जबाबदार आहोत. म्हणूनच निसर्ग



व मानवी साखळी टिकवण्यासाठी प्रत्येकाने 'हरीत पर्यटन' संस्कृती स्वीकारावी."

**...तर मधमाशांचा 'जीव' वाचेल!**

मधमाशा मानवावर सहज हल्ला करत नाहीत. मात्र, भडक रंग आणि तीव्र वासामुळे त्या विचलित होतात. जेव्हा मधमाशी डंख मारते, तेव्हा तिचा जीव जातो. निसर्गचक्रात महत्त्वाच्या असणाऱ्या या जिवांचा 'आत्मघातकी' मृत्यू टाळण्यासाठी पर्यटकांनी निसर्ग नियमांचे पालन करणे आवश्यक आहे, असे आवाहन डॉ. संतोष पाटील यांनी केले आहे.

इद्रीस मुलतानी यांच्या पुढाकाराने प्रत्येक हॉटेल, बस आणि लेणीतील महत्त्वाच्या जागांवर हे माहितीपूर्ण स्टिकर्स लावण्यास सुरुवात करण्यात आली आहे. अजिंठा वन परिक्षेत्र अधिकारी संतोष दोडके यांनीही लेणी परिसरात अशा प्रकारचे पोस्टर्स लावून जनजागृती मोहीम अधिक तीव्र केली आहे. या विमोचन सोहळ्याप्रसंगी अभिनव प्रतिष्ठानचे अध्यक्ष किरण पवार, सूर्यकिरण अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे सरव्यवस्थापक विजय चव्हाण, अरुण राठोड, स्वराज डापके यांची प्रमुख उपस्थिती होती.

**"सुरक्षित व हरीत पर्यटनासाठी आम्ही व्यापक काम हाती घेतले आहे. पर्यटकांनी भडक कपडे, सुवासिक अत्तर, स्प्रे यांचा वापर आवर्जून टाळावा. मोबाईलवर मोठ्याने गाणी वाजवू नयेत. याचा विपरित परिणाम राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या पर्यटकांवर होऊ नये. निसर्ग व ऐतिहासिक स्थळ पर्यटन आनंददायी होण्यास सर्वांनी सहयोग द्यावा."**

**— इद्रीस मुलतानी**
**(प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र भाजप अल्पसंख्याक विभाग)**

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान की प्रसिद्धीचा गाजावाजा

## देवणीतील प्रमाणपत्र वाटप; कार्यक्रमावर प्रश्नचिन्ह; माती तस्करी प्रकरण चर्चेत

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : राज्य शासनाच्या "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान" अंतर्गत शुक्रवार दिनांक ८ मे २०२६ रोजी सकाळी नऊ वाजता देवणी येथील विवेक वर्धिनी विद्यालय येथे महसूल मंडळ देवणी अंतर्गत प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात रहिवासी, ईडब्ल्यूएस, अल्पभूधारक आदी विविध प्रमाणपत्रांचे वितरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. कार्यक्रमास देवणी तालुक्यातील विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमादरम्यान तहसीलदार सोमनाथ वाडकर यांनी तब्बल ११८८ प्रमाणपत्रांवर स्वाक्षऱ्या केल्याचे सांगितले . मात्र प्रत्यक्षात उपलब्ध व वितरित झालेल्या रहिवासी प्रमाणपत्रांची संख्या सुमारे ९० असल्याची चर्चा उपस्थितांमध्ये सुरू होती. उर्वरित प्रमाणपत्रे नेमकी कोणत्या कालावधीतील होती, ती पूर्वीची प्रलंबित प्रकरणे होती का, याबाबत कोणतीही अधिकृत स्पष्टता देण्यात आली नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते.




कार्यक्रमात विविध मान्यवरांचा रोपटे व छोट्या झाडांच्या कुंड्या देऊन सत्कार करण्यात आला. "झाडे लावा, झाडे जगवा" असा संदेश देण्यात येत असताना देवणी येथील शासकीय गोदाम परिसरातील कथित काळी माती विक्री व तस्करी प्रकरण पुन्हा चर्चेत आले. या प्रकरणात तहसीलदार सोमनाथ वाडकर यांच्यावर आरोप होत असतानाही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली होती. त्यामुळे "माती तस्करी प्रकरण गुलदस्त्यात ठेवण्यासाठी पर्यावरणाचा देखावा केला जात आहे का?" असा सवाल काही नागरिकांकडून उपस्थित करण्यात आला.

कार्यक्रमावर राजकीय छाप स्पष्टपणे दिसून आली व तसेच सूत्रसंचालन महसूल बाहेरचे व्यक्तीचे ताब्यात देऊन त्यांना राजकीय रंग देणे अपेक्षित नव्हते. महसूल विभाग शासकीय यंत्रणेमार्फत हाताळायचा होता. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने अभियान राबवले जात असताना प्रत्यक्षात काम कमी आणि जाहिरातबाजी जास्त होत असल्याचा आरोप नागरिकांमधून व्यक्त करण्यात आला. "महाराजस्व अभियान की प्रसिद्धी अभियान?" असा प्रश्नही काही उपस्थितांनी उपस्थित केला.

. कार्यक्रमास अपेक्षित प्रमाणात नागरिकांचा प्रतिसादही लाभला नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, "तहसीलदार वाडकर की खोडकर?" अशी उपरोधिक चर्चा देवणी शहरात रंगताना दिसत असून, प्रशासनाने प्रमाणपत्र वितरण, प्रलंबित प्रकरणे आणि माती तस्करी आरोपांबाबत स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी नागरिकांमधून पुढे येत आहे.

# शेतरस्त्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांचे उपोषण सुरू - जिल्हाधिकारी कार्यालय

## गावकऱ्यांचा प्रशासनाविरोधात संताप; तातडीने रस्ता करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी बीड :** अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या शेतरस्त्याच्या मागणीसाठी अखेर शेतकरी व ग्रामस्थांनी उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे. बीडच्या वडवणी तालुक्यातील खडकी (खंडोबाची वाडी) गावातील शेतकरी गुरुवारपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण आहे. मागील चार वर्षापासून सातत्याने तहसील कार्यालयाने शेतरस्त्याबाबतच्या निवेदनाबाबतची दखल न घेतल्याने आमरण उपोषण करण्याची वेळ शेतकऱ्यांकडे आली आहे.जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम १४३ नुसार शेतकऱ्यांच्या शेताकडे जाणारा रस्ता उपलब्ध व्हावा यासाठी गावातील गट क्रमांक ६०९, ६१०,५९०, व ५९१ मधील मागणीसाठी शेतकरी एकत्र आले आहेत. शेतकऱ्यांना पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात चिखलाचा सामना करावा लागतो. ट्रॅक्टर, बैलगाड्या तसेच शेतीमाल वाहतुकीसाठी मोठा त्रास सहन करावा लागत असून अनेकदा शेतमाल वेळेत बाजारात पोहोचत नसल्याने आर्थिक नुकसान होत असल्याची भावना गावातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली.यासंदर्भात तहसील कार्यालय, उपविभागीय




**शेतरस्त्या संदर्भात मागील चार वर्षांपासून मागणी करत आहोत. परंतु प्रशासन निवेदनाची दखल घेत नाही. केवळ शेत रस्ता सुनावणी संदर्भात तारीख जाहीर होते. मात्र प्रत्यक्षात चर्चा घडून येत नाही. त्यामुळे यंदाही पावसाळ्यात शेतमालाची कसरत करावी लागेल. प्रशासनाने मागणीसंदर्भात उपाययोजना कराव्यात.**

**उपोषणकर्ते**
**अंकुश यादव व इतर सर्व संबंधित शेतकरी.**

कार्यालय माजलगाव, जिल्हाधिकारी कार्यालय यांना अनेक वेळा निवेदने देऊनही प्रशासनाने कोणतीही ठोस कार्यवाही केली नसल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. प्रशासनाकडून वारंवार शेतरस्त्या संदर्भात सुनावणीची तारीख देण्यात येते, परंतु प्रत्यक्षात सुनावणी होत नसल्याचे चित्र आहे. अखेर संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी उपोषण सुरू करत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. उपोषणस्थळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. "शेतरस्ता हा आमचा हक्क आहे.

# ग्रामीण गुणवत्तेला योग्य मार्गदर्शनाची गरज : नगराध्यक्ष अब्दुल समीर

## सिल्लोडमध्ये 'मेडिकोज-थर्टी' कोचिंग क्लासेसचे थाटात उद्‌घाटन; मान्यवरांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड शहरातील शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या 'मेडिकोज-थर्टी' कोचिंग क्लासेसच्या नवीन शाखेचे उद्घाटन बुधवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. शहरातील महाराणा प्रताप चौक येथे सुरू करण्यात आलेल्या शाखेचे उद्घाटन नगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात हाफिज एजाज यांच्या कुरआन पठणाने झाली. त्यानंतर कोचिंग




क्लासेसचे व्यवस्थापक अबुजर खान यांनी प्रास्ताविकात विद्यार्थ्यांच्या जीवनातील उच्च शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच 'मेडिकोज-थर्टी'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना NEET, JEE आणि CET सारख्या स्पर्धा परीक्षांसाठी उत्तम शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून दिले जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मार्गदर्शन करताना नगराध्यक्ष अब्दुल समीर म्हणाले की, सिल्लोडसारख्या शहरात आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण कोचिंग सुविधा उपलब्ध होणे विद्यार्थ्यांसाठी अत्यंत लाभदायक ठरणार आहे. ग्रामीण व छोट्या शहरांतील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेची कोणतीही कमतरता नसते, मात्र त्यांना योग्य मार्गदर्शन आणि संधी मिळणे गरजेचे असते. 'मेडिकोज-थर्टी'चा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही संस्थेच्या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांना मेहनत, शिस्त आणि सातत्याच्या जोरावर यश मिळविण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांच्या वतीने उपस्थित मान्यवर व नागरिकांचे आभार मानण्यात आले. या कार्यक्रमाला नगरसेवक विठ्ठल सपकाल, मनोज झवर, इमरान उर्फ गुड्डू, शंकरराव खांडवे, डॉ. रशीद, व्यवस्थापक अबुजर खान, प्रा. दीपक कुमार पांडेय, साईद अख्तर, आदित्य शर्मा, शाहिद नजीर, अमोदी अब्दुल्लाह, मुश्ताक सिद्दीकी, अब्दुल हमीद, मौलाना अख्तर कुरेशी आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# कोपरा येथील शिवम ठाकूरचे घवघवीत यश; एसएससी परीक्षेत ८४ टक्के गुणांसह शाळेत प्रथम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल खारघर** : कोपरा येथील श्री हनुमान ग्रामविकास मंडळ संचलित न्यू इंग्लिश शाळा मधील विद्यार्थी कु. शिवम गणेश ठाकूर याने एस.एस.सी. परीक्षेत ८४.०० टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावून शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर शिवमने हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. निकाल जाहीर होताच शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शिक्षक, पालक, मित्रपरिवार तसेच ग्रामस्थांकडून त्याचे कौतुक



करण्यात येत आहे. शिवम हा सुरुवातीपासूनच अभ्यासात हुशार व शिस्तप्रिय विद्यार्थी म्हणून ओळखला जात होता. नियमित अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यामुळे त्याला हे यश मिळाल्याची भावना त्याने व्यक्त केली. भविष्यात उच्च शिक्षण घेऊन समाजासाठी चांगले कार्य करण्याची इच्छाही शिवमने बोलून दाखवली. यावेळी शाळेच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या यशामागे पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची मेहनत महत्त्वाची असल्याचे सांगितले. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थीदेखील योग्य संधी आणि मार्गदर्शन मिळाल्यास मोठे यश मिळवू शकतात, हे शिवमच्या निकालातून पुन्हा अधोरेखित झाल्याचे मत व्यक्त करण्यात आले. शिवम गणेश ठाकूर याच्या या उज्ज्वल यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# नवी मुंबईमध्ये ज्युनियर महाराष्ट्र, महाराष्ट्र श्री स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशन यांचे सौजन्याने शनिवार दिनांक 2 मे 2026 रोजी राज्यस्तरीय उंची गटाची विविध शरीर सौष्ठव स्पर्धा पार पडली. नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनचे क्रीडाप्रेमी क्रियाशील सेक्रेटरी डॉ. विजय पाटील यांच्या आयोजनाखाली या स्पर्धा पार पडल्या.

या स्पर्धेसाठी नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनचे उपाध्यक्ष विजय पाटील, चेअरमन दत्तू बी.पाटील (हेल्थ क्लब) खजिनदार संजय निकम आणि त्यांचे सर्व सहकारी यांनी स्पर्धेसाठी यांचे मोलाचे सहकार्य झाले. नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनचे ॲमेचुएर बॉडी बिल्डिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या संघटनेच्या मान्यतेने या स्पर्धा झाल्या. या स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री नामदार गणेश नाईक यांच्या हस्ते झाले होते.

या स्पर्धेच्या वेळी हौशी संघटनेच्या माध्यमातून मुंबई, नवी मुंबई, ठाणे, उपनगर येथे कार्यरत असलेल्या सेवाभावी कार्यकर्त्यांचा, पंच यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये नंदकुमार तावडे (मुंबई), अरुण कुरळे (मुंबई), प्रवीण खामकर (मुंबई), शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रशांत नारकर (मुंबई), सुरेंद्र महाडिक (नवी मुंबई), हेमंत पाटील (उपनगर मुंबई), गिरीश शेट्टी (ठाणे) आदी मान्यवरांचा समावेश आहे.

**या स्पर्धेचे किताब विजेते खालील प्रमाणे आहेत.**

१) ज्युनियर महाराष्ट्र श्री 2026 -सोहम संजय धामणकर (मुंबई)

२) महाराष्ट्र मेन्स फिटनेस 2026-ईश्वर प्रदीप ढोलम (उपनगर)

३) महाराष्ट्र मास्टर श्री 2026 (४०/५० वर्षावरील) संतोष अशोक बंगेरा, मुंबई

४) महाराष्ट्र श्री 2026-अजय गणपत कडू (मुंबई)

या स्पर्धेसाठी मुंबई, मुंबई उपनगर, नवी मुंबई, रायगड, कोल्हापूर, बीड आधी जिल्ह्यातील व्यायामपटू आलेले होते. पंच म्हणून राजन उतेकर, सुनील हिर्लेकर, राजेंद्र गुरव, सुरेंद्र महाडिक, नंदकुमार तावडे तर स्कोरर म्हणून निखिल पाटकर, जितेंद्र आळेकर, किसन धावडे इत्यादींनी कामकाज पाहिले.

# भीम गर्जना मित्र मंडळातर्फे बुद्ध, शिवराय आणि आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सवाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** : भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवानिमित्त भिम गर्जना मित्र मंडळ (रजि.) यांच्या वतीने दोन दिवसीय सामाजिक प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार, दि. ९ मे २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता "महापुरुषांच्या विचारांचे सामाजिक प्रबोधन" या विषयावर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली असून "स्वराज्य सूर्य शिवराय, ज्ञानसूर्य भीमराय" या विषयावर प्रा. दामोदर दादा मोरे (साहित्यिक विचारवंत) मार्गदर्शन करणार आहेत.

तसेच रविवार, दि. १० मे २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता "सामाजिक प्रबोधन व नृत्याचा अविष्कार" हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात प्रथमच कलामंच मुंबईची निर्मिती सादर होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विक्रोळीचे आमदार सुनील राऊत उपस्थित राहणार आहेत. मंडळाचे अध्यक्ष अशोक रोकडे, उपाध्यक्ष प्रदीप खरात, अरविंद जाधव, प्रभाकर रामराजे व चिटणीस विनोद खरात तसेच सहसचिव तुषार गायकवाड व निलेश साळवी यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाची तयारी करण्यात आली आहे.

कार्यक्रमाचे ठिकाण महात्मा फुले चौक, कन्नमवार नगर-१, विक्रोळी (प.), मुंबई येथे असून विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनपर उपक्रमांमुळे या महोत्सवाकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# पालोदच्या आरोग्य सेवकाला लोखंडी फायटरने मारहाण

## सिल्लोड ग्रामीण पोलिसात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड:-तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र पालोद येथे कार्यरत असलेले आरोग्य सेवक किरणकुमार मोतीराम सोनवणे (वय ४०) यांना रस्त्यात अडवून लोखंडी फायटरने मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात दोन आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस दप्तरी नोंदवलेल्या फिर्यादीनुसार, ६ मे २०२६ रोजी आरोग्य सेवक किरणकुमार सोनवणे हे तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, सिल्लोड येथे शासकीय कामकाजाचा अहवाल सादर करण्यासाठी गेले होते. दुपारी ४:०० वाजेच्या सुमारास काम संपवून ते आपल्या मोटारसायकलने पुन्हा पालोद आरोग्य केंद्रात कर्तव्यावर जात असताना, सिल्लोड-पालोद रोडवरील हरिओम जिनिंगसमोर आरोपी विलास आश्रुबा नरवडे आणि मोहसीन शेरखान पठाण (दोघे रा. सिल्लोड) यांनी त्यांना हात दाखवून थांबवले.

सोनवणे यांनी ओळखीचे लोक असावेत म्हणून गाडी थांबवताच, आरोपींनी त्यांना जुन्या तक्रारींच्या रागातून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार, आरोपी विलास नरवडे याने त्याच्या हातातील लोखंडी फायटरने सोनवणे यांच्या डोक्यावर, उजव्या खांद्यावर आणि उजव्या बाजूच्या गुडघ्यावर प्रहार करून त्यांना जखमी केले. यावेळी आरोपींनी त्यांना जीवे मारण्याची धमकीही दिली. आरडाओरड झाल्याने आजूबाजूचे लोक जमा झाले असता आरोपींनी तेथून पळ काढला. जखमी सोनवणे यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.या घटनेप्रकरणी किरणकुमार सोनवणे यांच्या फिर्यादीवरून सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपी विलास आश्रुबा नरवडे व मोहसीन शेरखान पठाण यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ११८(१), ३५१(२), ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल सचिन काळे हे करत आहेत.

# खालपुरात बाळ विवाह रोखण्यात यश; प्रशासनाच्या तत्परतेने थांबविला बालविवाह

**दैनिक युवक आधार**
**खालापूर - संतोष शेवाळे** : अल्पवयीन मुलांचे होणारा बालविवाह प्रशासनाच्या सतर्कतेमुळे व तातडीच्या हस्तक्षेपामुळे यशस्वीरीत्या थांबविण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार अल्पवयीन मुलगा हरेश कमलू पवार याचा विवाह दिनांक 13 मे 2026 रोजी डोणवत आणि शाम रोहिदास पवार याचा दिनांक 21 मे 2026 रोजी डोणेवाडी,कर्जत येथील मुलींसोबत ठरविण्यात आला होता. याबाबतची गोपनीय माहिती चाइल्ड हेल्पलाईन १०९८ या टोल फ्री क्रमांकावर प्राप्त झाल्यानंतर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारीश्रीकांत हावळे यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने पथक गठीत करून प्रतिबंधात्मक कार्यवाही करीत तत्काळ घटनास्थळी पाठविण्यात आले.



सदर पथकामध्ये महिला व बाल विकास विभाग,संरक्षण अधिकारी,चाइल्ड हेल्प लाईन,पोलीस विभाग तसेच स्थानिक प्रशासन यांचा समावेश होता. महिला व बाल विकास विभागाच्या मार्गदर्शनाखाली एम.जी. जोरकर (म्हसे) बालविवाह प्रतिबंधक अधिकारी तसेचअंगणवाडी सेविका हिरा किशोर गायकर सहाय्यक यांनी पालकांकडून बालविवाह न करण्याबाबतचा जबाबनामा घेतला.

प्रशासनाच्या समजावणीमुळे कुटुंबियांनी विवाह थांबविण्यास सहमती दर्शविली. यानंतर मुलांचे शिक्षण व सुरक्षिततेस प्राधान्य देण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मुलांना बाल कल्याण समिती, रायगड येथे हजर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पुढील कार्यवाही बाल कल्याण समितीमार्फत करण्यात येणार आहे.ही कार्यवाही जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीकांत हावळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिप्ती रामरामे संरक्षण अधिकारी,श्री प्रमोद पाटील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रमोद पाटील ,संघमिता आंधोरीकर पर्यवेक्षिका, प्रकाश पवार समन्वयक चाईल्ड हेल्पलाइन,सतीश बांगर पोलिस नायक,मिथुन गुंजाळ सहाय्यक संरक्षण अधिकारी , श्रीम.एम.जी.जोरकर ग्रामपंचायत खरवलीचे ग्रामपंचायत अधिकारी व श्री.सुधीर नाना परबळकर पोलिस पाटील,श्रीम.हिरा गायकर अंगणवाडी सेविका,आणि मदतनीस यांच्या समन्वयाने पार पडली.करण्यात आलेल्या जबाबनाम्यावर कुटुंबियांसोबत संवाद साधण्यात आला. चाइल्ड हेल्प लाईन रायगडचे प्रकल्प समन्वयक प्रकाश पवार यांनी कुटुंबियांचे समुपदेशन करून बालविवाहाचे दुष्परिणाम तसेच कायदेशीर परिणाम याबाबत सविस्तर माहिती दिली.

**बालविवाह म्हणजे नक्की काय म्हणतो?**

**अल्पवयीन मुलीच्या लग्नाबाबत कायदेशीर तरतुदीः**

बालविवाह काय आहे?: जर वधूचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आणि वराचे वय २१ वर्षांपेक्षा कमी असेल, तर तो विवाह 'बालविवाह' ठरतो.

शिक्षेची तरतूदः बालविवाह लावणारे, प्रोत्साहन देणारे (पालक, नातेवाईक, धार्मिक स्थळाचे अधिकारी) या सर्वांना २ वर्षांपर्यंत सश्रम कारावास आणि १ लाख रुपये दंड होऊ शकतो.

विवाह रद्द करणेः अल्पवयीन मुलगी प्रौढ (१८ वर्षे पूर्ण) झाल्यानंतर २ वर्षांच्या आत (म्हणजेच वयाच्या २० वर्षांपर्यंत) हा विवाह रद्द करण्यासाठी न्यायालयात अर्ज करू शकते.

पोस्को (POCSO) कायदाः अल्पवयीन मुलीचे लग्न झाल्यास पोस्को, २०१२ (लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण) कायद्यांतर्गत सुद्धा गुन्हा दाखल होऊ शकतो.

साखरपुडा गुन्हाः अल्पवयीन मुलीचा साखरपुडा करणे हा सुद्धा कायदा अंतर्गत गुन्हा आहे

# सिल्लोड तालुक्याचा 'दहावी'त डंका ; निकाल ९४ .६५ टक्के

## यंदाही मुलींचीच सरशी ; 'लॉजिक कॉम्प्युटर्स'तर्फे विद्यार्थ्यांना मोफत निकालाची सेवा

**दैनिक युवक आधार**
**सिल्लोड वार्ताहर** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १० वी (SSC) परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. यामध्ये सिल्लोड तालुक्याने आपली शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखत ९४.६५ टक्के इतका घवघवीत निकाल नोंदविला आहे. यंदाही निकालाच्या टक्केवारीत मुलींनी मुलांच्या तुलनेत वरचढ ठरत पुन्हा एकदा यशाची आघाडी घेतली आहे.

यंदाच्या परीक्षेसाठी तालुक्यातून एकूण ६,९१८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ६,८८४ विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेस बसले होते. यामध्ये ३,७३६ मुले व ३,१४८ मुलींचा समावेश होता. जाहीर झालेल्या निकालात एकूण ६,५१६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यात ३,४३९ मुले तर ३,०७७ मुलींनी यश संपादन केले. मुलांच्या निकालाची



टक्केवारी ९२.०५ इतकी असून, मुलींनी ९७.७४ टक्के निकाल नोंदवत तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

**तालुक्यातील खालील शाळांनी यंदा १०० टक्के निकालाची परंपरा राखली आहे:**

राष्ट्रमाता इंदिरा गांधी कन्या विद्यालय, सिल्लोड
जिल्हा परिषद हायस्कूल, अजिंठा
हिंदुस्तान उर्दू माध्यमिक शाळा, अंधारी
सलीम उर्दू हायस्कूल, शिवणा
श्री मुर्डेश्वर विद्यालय, केळगाव
शासकीय आश्रमशाळा, हट्टी
माध्यमिक विद्यालय, धानोरा
मंदोदरी माध्यमिक विद्यालय, मंगरूळ
संत एकनाथ माध्यमिक विद्यालय, सिल्लोड
प्रगती उर्दू हायस्कूल, डोंगरगाव (ता. सिल्लोड)
श्री शिवछत्रपती माध्यमिक विद्यालय, टाकळी जिवराग
नॅशनल इंग्लिश हायस्कूल, अजिंठा (ता. सिल्लोड)
स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय
माणिकराव पालोदकर इंग्लिश हायस्कूल
स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल
स्वामी विवेकानंद विद्यालय
श्री स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल, मोढा

**'लॉजिक कॉम्प्युटर्स'चा सामाजिक उपक्रम**

निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांची इंटरनेट व प्रिंटसाठी होणारी गैरसोय टाळण्यासाठी सिल्लोड शहरातील 'लॉजिक कॉम्प्युटर्स' (Logic Computers) यांच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत निकाल पाहून त्याच्या प्रिंट काढून देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. या उपक्रमाचा शेकडो विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. त्वरित सेवा मिळाल्याने विद्यार्थी व पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. सिल्लोड तालुक्याच्या या दैदीप्यमान यशाबद्दल शिक्षण क्षेत्रातून विद्यार्थी, शिक्षक व पालकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# साहित्य आणि संत विचारच समाजाला योग्य मार्ग दाखवतात :- जयदत्त भैय्या धस

## राधा देशमुख यांच्या पुस्तकाचे प्रकाशन...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)** : - बुधवार ६ मे २०२६ रोजी पाटोदा शहरातील नगरेश्वर मंदिर परिसरात आयोजित कार्यक्रमात मोक्ष माझा सांगाती' या पुस्तकाचे प्रकाशन मोठ्या उत्साहात पार पडले. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या रचनेवर आधारित २७५ ओव्यांचा मराठीत व अतिशय सोप्या भाषेत अनुवाद करून लेखिका सौ.राधा राहुल देशमुख यांनी ही उल्लेखनीय साहित्यकृती साकारली आहे. या पुस्तकाचे प्रकाशन आष्टी/ पाटोदा/शिरूर मतदारसंघाचे युवा नेते जयदत्त भैय्या धस यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या वेळी बोलताना जयदत्त धस यांनी साहित्य आणि संत विचारच समाजाला योग्य मार्ग दाखवतात असे प्रतिपादन करत



ग्रामीण भागातील साहित्यिकांना प्रोत्साहन देण्याची गरज अधोरेखित केली. आजच्या मोबाईलच्या युगात वाचन संस्कृती हळूहळू कमी होत चालली असून ही चिंतेची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. नव्या पिढीने संत-महंतांचे विचार समजून घेणे अत्यंत आवश्यक असून अशा साहित्यकृती समाजाला सकारात्मक दिशा देतात असे ही त्यांनी सांगितले. मोक्ष माझा सांगाती' या पुस्तकामधून संत ज्ञानेश्वरांच्या ओव्यांचा सुलभ व सुगम अर्थ सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या साहित्यकृतीमुळे वाचन संस्कृतीला चालना मिळून नव्या पिढीपर्यंत संत विचार पोहोचण्यास मदत होणार असल्याचे उपस्थितांनी सांगितले. या प्रकाशन सोहळयास लेखिका सौ.राधा राहुल देशमुख, अँड.महेश बेदरे, राहुल बप्पा शिंदे, प्रशांत देशमुख, किशोर देशमुख, राहुल देशमुख, किशोर देशमुख, गंगा देशमुख, गोविंद देशमुख, गणेश पांडव यांच्या सह अनेक मान्यवर व पुस्तक प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लहानपणीच भविष्याची बी पेरली जाते

**दैनिक युवक आधार**
**भावेश धंधुकीया/ भंडारा जिल्हा प्रतिनिधी** : आर्ट्स ऑफ लाईट कोचिंग लाखनी चे संचालक श्री निहाल जी वालदे सर यांचे वैयक्तिक अनुभव तसेच लाखनी तालुक्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला उच्च स्तरावर नेण्याचा ध्यास हे त्यांच्या कार्यातूनच दिसून येते. आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग च्या कार्याबद्दल लाखनी तालुक्यातील प्रत्येक व्यक्तीला जाणीव आहेच. आर्ट्स ऑफ लाईट कोचिंग च एकच उद्देश तो म्हणजे शालेय शिक्षणासोबत कौशल्याचे शिक्षण आज प्रत्येक विद्यार्थ्याला मिळणे गरजेचे आहे. त्याचबरोबर भविष्यामध्ये ज्या स्पर्धा परीक्षांना प्रत्येक विद्यार्थ्याला सामोरे जावे लागते अशा स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी लहानपणीच झाली पाहिजे हाच उद्देश आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग चा आहे. या उद्देशाची पूर्तता करण्यासाठी आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग दरवर्षी समर ट्रेनिंगचे आयोजन करते. या समर ट्रेनिंग मध्ये सर्वात महत्त्वाची ट्रेनिंग म्हणजे एमपीएससी यूपीएससी च बेसिक फाउंडेशन. एमपीएससी आणि यूपीएससी हे स्पर्धा




परीक्षा नेमके काय असते कोण या स्पर्धा परीक्षांना आयोजित करते त्यामधून कोणते कोणते सरकारी नोकरी आपल्याला मिळू शकते त्याचे काय फायदे आहेत आणि या स्पर्धा परीक्षेचा काय उद्देश आहे हे सर्व बाबी या समर ट्रेनिंग मधून जाणून घ्यायला मिळते. आज दिनांक 9 मे 2026 रोज शनिवारला या समर ट्रेनिंग ची सुरुवात होत आहे. समर ट्रेनिंग ची सुरुवात अति महत्त्वाच्या ट्रेनिंग पासून म्हणजेच एमपीएससी यूपीएससी च्या बेसिक फाउंडेशन नी होणार आहे. ही ट्रेनिंग देण्याकरिता नामवंत प्रशिक्षक, कोच, शिक्षक आणि बहुतांश विद्यार्थ्यांना त्यांचे ध्येय गाठण्यासाठी जीवाचं रान करून सातत्याने प्रयत्न करत असणारे असे AIM HIGH (MPSC - UPSC ) कोचिंग अकॅडमी नागपूरचे संचालक श्री अमित सवयी सर, यांच्या ट्रेनिंग पासून समर ट्रेनिंग ची सुरुवात होणार आहे. लाखनी तालुक्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला आणि प्रत्येक पालकाला आर्टस ऑफ लाइफ कोचिंग तर्फे निवेदन आहे की अशा उत्कृष्ट प्रशिक्षकांकडून जर तुम्हाला लाभ घ्यायचं असेल तर आर्ट्स ऑफलाई कोचिंग चे दार प्रत्येक गरजू विद्यार्थी तसेच प्रत्येक गरजू पालक यांच्यासाठी नेहमी उघडे आहेत. आजच्या या प्रशिक्षणामध्ये नेमके कोणत्या बाबींवर अमित सवयी सर मार्गदर्शन करणार आहे हे तुम्हाला पोस्टर मध्ये दिसतच आहे. तर चला लाखनी तालुक्याला एक वेगळी ओळख देऊया आणि विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्याच्या मार्गावर लागू या. सर्व लाखनी तालुक्यातील बांधवांचा आर्टस ऑफ लाइफ कोचिंग चे संचालक श्री निहाल वालदे सर यांनी मनापासून आभार मानले आहे आणि त्यांनी म्हटले आहे की असंच लाखनी तालुक्यातील बांधवांचा त्यांना साथ आणि हातात हात मिळत राहील तर एक दिवस नक्कीच लाखनी तालुक्यातील प्रत्येक विद्यार्थी एक नवी उंची गाठेल आणि असे शिक्षण आणि प्रशिक्षण आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग मध्ये नेहमी होत राहतील अशी अशी हमी पण दिली. निहाल वालदे सरांच्या या प्रयत्नाला आमचा सलाम आणि पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा.

# "SSC.निकालात स्मॉल वंडर्सचा 100% निकाल,शशांक सोमेश्वर येलके 90% गुणांसह प्रथम"

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे** : वडकी येथील स्मॉल वंडर्स हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथील विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावी एस.एस.सी परीक्षा २०२५-२६ मध्ये १००% निकाल लावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ८ मे रोजी जाहीर झालेल्या निकालात सर्व विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण होत उत्कृष्ट टक्केवारी मिळवली आणि संस्थेच्या उज्ज्वल निकालाची परंपरा यंदाही कायम राखली. या परीक्षेत शशांक सोमेश्वर





येलके या विद्यार्थ्यांने ९०% गुणांसह प्रथम क्रमांक पटकावून संस्थेचे नाव उज्ज्वल केले. मयुर मोरेश्वर ताठे या विद्यार्थी ने ८८.४०% गुणांसह द्वितीय तर जिवितेष आशिष गवळी ८७.२०% गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला.याशिवाय इतर विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय कामगिरी नोंदवली असून, वंशिका शैलेश बेलेकर ८३.८०% तर अनुज विजय कांबळे ७७% यांनीही चांगले यश संपादन केले. इतर विद्यार्थ्यांनीही समाधानकारक निकाल देत शाळेची यश परंपरा अधिक भक्कम केली आहे.

या घवघवीत यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे सर्वत्र कौतुक होत आहे,शंभर टक्के निकाल हा संस्थेच्या सातत्यपूर्ण गुणवत्तेचा आणखी एक ठोस पुरावा ठरला आहे.

शाळेच्या प्राचार्या डॉ. मंजुषा सागर, तसेच अहमद शेख,विजय फुलकर,वैभव करडे,शंकर मालखेडे व इतर शिक्षकवर्ग यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या मेहनतीचे कौतुक केले आणि पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जासई विद्यालयाचा दहावीचा निकाल ९२ .८१%

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर** : रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनियर कॉलेज, जासई हे उरण तालुक्यातील एक नावाजलेले हायस्कूल आहे . दरवर्षी प्रमाणे आपल्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम ठेवत, शैक्षणिक वर्ष २०२५ -२०२६ मध्ये विद्यालयाचा दहावीचा निकाल ९२.८१ % लागला आहे. यामध्ये प्रधान यश राजेभाऊ हा ८६.४० % गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांकाने तर कु. बाम्हणे कार्तिकी




दशरथ ही विद्यार्थिनी ८५.८०% गुण मिळवून विद्यालयात दुसऱ्या क्रमांकाने तर मुरकुटे प्रसाद नाथराव हा विद्यार्थी ८५% गुण मिळवून विद्यालयात तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत .

यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे चेअरमन मा. श्री अरुण जगे साहेब,सर्व स्थानिक स्कूल कमिटी सदस्य,विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मा. सौ . के. जी .मॅडम ,उपमुख्याध्यापक श्री कुटे सर ,पर्यवेक्षिका सौ. मुकादम मॅडम शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन !

कला आणि क्रीडा यांचा अनोखा संगम

## "रंगकर्मी क्रिकेट लीग"चा दिमाखदार ट्रॉफी आणि टी-शर्ट अनावरण सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई: (केतन भोज)** : चंदेरी दुनियेतील कलाकार जेव्हा हातात बॅट आणि चेंडू घेतात, तेव्हा मैदानातही मनोरंजनाचा षटकार पाहायला मिळतो. रंगभूमी आणि चित्रपट क्षेत्रातील कलाकारांना एकत्र आणणाऱ्या बहुचर्चित "रंगकर्मी क्रिकेट लीग" (RCL) स्पर्धेचा अधिकृत ट्रॉफी आणि टी-शर्ट लॉन्चिंग सोहळा नुकताच मुंबईत मोठ्या थाटामाटात पार पडला. या सोहळ्याला श्री. श्रीकांत भारतीय आणि श्री. मंगेश सांगळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. कलाकारांमधील एकोपा आणि खिलाडूवृत्ती जोपासण्यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन होणे काळाची गरज असल्याचे मत मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले. त्यांच्या उपस्थितीने सोहळ्याची रंगत द्विगुणित झाली. या स्पर्धेचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे संघांचे नेतृत्व करणारे दिग्गज कलाकार! यंदा मैदानात आपली रणनीती आखण्यासाठी सज्ज झाले आहेत: विजय पाटकर, सागर कारंडे, हरीश दुधाडे, कांचन पगारे, संचित यादव आणि नूपुर दुधवडकर या दिग्गज कलाकारांच्या सहभागामुळे प्रेक्षकांमध्ये स्पर्धेबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात संचित यादव आणि शितल कल्लापुरे यांनी मोलाची भूमिका बजावली. आकर्षक चकाकणारी ट्रॉफी आणि विशेष डिझाइन केलेले टी-शर्ट्स हे या संध्याकाळचे मुख्य आकर्षण ठरले. या उपक्रमाला पंडित राठोड, सचिन खांडागळे, संदीप राठोड, गणेश गारगोटे, ओमकार सर आणि अखिलेश चौबे या प्रायोजकांनी भक्कम पाठबळ दिले आहे. "केवळ अभिनयच नाही, तर मैदानावरही आमची मैत्री आणि एकता दिसावी, हाच या लीगचा मुख्य उद्देश आहे." क्रिकेटप्रेमी आणि चाहत्यांसाठी ही एक पर्वणीच ठरणार आहे. या लीगचे सामने खालीलप्रमाणे रंगणार आहेत: दिनांक: १४ आणि १५ मे २०२६. ठिकाण: परळ सेंट्रल रेल्वे ग्राऊंड, मुंबई. अंतिम सामना हे या स्पर्धेचे विशेष आकर्षण असेल.

तरी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून आपल्या आवडत्या कलाकारांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. आता सर्वांचे लक्ष लागले आहे ते 'परळ'च्या खेळपट्टीवर... कोण उंचावणार विजयाची ट्रॉफी?


# खालापूर येथे श्री स्वामी समर्थ मठ प्राणप्रतिष्ठा व धार्मिक सोहळ्याचे आयोजन

स्वर्गीय नरहरी (आण्णा) पाटील यांचे स्वप्न साकार; खालापूरात भव्य श्री स्वामी समर्थ मठ उभा

**दैनिक युवक आधार**

**खालापूर : संतोष शेवाळे** : खालापूर शहरातील श्री स्वामी समर्थ मठाच्या नव्या वास्तूच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून ९ मे ते १४ मे २०२६ या कालावधीत हा उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा होणार आहे. स्वामी भक्तांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात नामस्मरण, हरिपाठ, प्रवचन, होमहवन, रूद्राभिषेक, भव्य मिरवणूक तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार दि. ९ मे रोजी सकाळी १० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत खालापूर गावातील मठातून चालन विधी म्हणजे मूर्ती हलविण्याचा कार्यक्रम पार पडणार आहे. त्यानंतर नवीन मठाच्या वास्तूची वास्तुशांती होणार असून सायंकाळी नामस्मरणाचा कार्यक्रम आयोजित




करण्यात आला आहे. रविवार दि. १० मे रोजी सकाळी ९ ते ११.३० या वेळेत नवीन मठापासून भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून विविध हरिपाठ मंडळांचा सहभाग राहणार आहे. यामध्ये वरद विनायक हरिपाठ महिला मंडळ, महड, खालापूर हरिपाठ महिला मंडळ, जय हनुमान प्रासादिक हरिपाठ मंडळ, इसांबे उदकशांती आदी मंडळांचा समावेश आहे.

१२ आणि १३ मे रोजी होमहवन, नामस्मरण, प्रवचन आणि भजनी कार्यक्रम होणार असून विविध भजनी मंडळे भक्तिरसाची मेजवानी देणार आहेत.

गुरुवार दि. १४ मे रोजी सकाळी श्री गणेशपूजन व न्यासपूजनानंतर श्री स्वामी समर्थांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा पार पडणार आहे. त्यानंतर महाआरती, महाप्रसाद, रूद्रहवन आणि पूर्णाहुतीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. सायंकाळी रायगड भूषण ह.भ.प. भगवान महाराज कुंभार व ज्ञानेश्वर बुवा पाटील चिंचवली गोहे यांच्या उपस्थितीत भजनी कार्यक्रम रंगणार आहे.

श्री स्वामी समर्थ मठ खालापूरचे संस्थापक स्वर्गीय नरहरी बाळकृष्ण पाटील (आण्णा) यांनी या मठाचा पाया रचला होता. त्यांच्या स्वप्नातील हा भव्य दिव्य मठ आज स्वामी भक्तांच्या लोकवर्गणीतून पूर्णत्वास आला आहे. गुरूवर्य दिपक काका जोशी, धर्माधिकारी गुरूजी आणि सुनिल गुप्ते साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली हा धार्मिक सोहळा पार पडत असून स्वामी भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## ईश्वर नामाशिवाय जीवनाला सार्थकता नाही – ह.भ.प. पूजाताई थोरात

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे** : "नको नको मना गुंतू मायाजाळी, काळ आला जवळी ग्रासावया..." या संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या अभंगातील जीवनाचे तत्त्वज्ञान सांगत मानवी जीवन क्षणभंगुर असून ईश्वर नाम हाच खरा आधार आहे, असे प्रतिपादन ह.भ.प. पूजाताई थोरात यांनी केले.



अंभोरा येथे कै. स्व. सुदामती बबन थोरात यांच्या दशक्रिया विधीनिमित्त आयोजित प्रवचन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. स्व. सुदामती थोरात यांचे दहा दिवसांपूर्वी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले होते. त्यांच्या दशक्रिया विधीप्रसंगी आयोजित धार्मिक कार्यक्रमात ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा आधार घेत ह . भ.प.पूजाताई थोरात यांनी जीवनाचे वास्तव अत्यंत प्रभावी शब्दांत मांडले. त्या म्हणाल्या की, मनुष्य हा संसाराच्या मोह-मायेत इतका गुंतून जातो की ईश्वर नाम विसरून जातो. परंतु काळ जवळ आल्यावर धन, मान, पद, नातीगोती काहीही उपयोगी पडत नाही. शेवटी फक्त ईश्वर नाम आणि सत्कर्मच माणसाच्या पाठीशी उभे राहतात.

"देवाने दिलेला हा अनमोल देह व्यर्थ घालवू नका. वेळेत जागे व्हा, ईश्वर नामाची माळ जपा. नामस्मरणाने मनाला शांती मिळते, जीवनाला दिशा मिळते आणि आयुष्याचे खरे सार्थक होते," असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

प्रवचनादरम्यान उपस्थित भाविकांनी प्रवचनाचा लाभ घेतला . कार्यक्रमानंतर उपस्थितांनी स्व. सुदामती थोरात यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक संपन्न

## खरीप हंगामात कृषी विभागाने शेतकऱ्यांना खते व बियाणांचा पुरवठा सुरळीत होण्याची दक्षता घ्यावी – रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले

**दैनिक युवक आधार**

**रायगड-अलिबाग :** आगामी खरीप हंगाम लक्षात घेता बियाणे, खते, कीटकनाशके आदी निविष्ठा सर्वत्र उपलब्ध असण्याच्या दृष्टीने परिपूर्ण नियोजन करा तसेच कोणत्याही परिस्थितीत खते, बियाणे यांची टंचाई भासणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी, असे निर्देश रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी दिले.



जिल्हा नियोजन भवन सभागृहात आयोजित खरीप हंगाम आढावा बैठकीत रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले बोलत होते.

या बैठकीला आमदार महेंद्र दळवी, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, सभापती वैकुंठ पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी डॉ.रुपाली सातपुते, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे आदी उपस्थित होते.

# मुंबई पुणे द्रुतगती मार्ग : एक परिवर्तन

१ मे २०२६ च्या माननीय मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील उद्घाटनानंतर मुंबई पुणे द्रुतगती अर्थात यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावरून जाण्याचा योग आला व या मार्गाच्या परिवर्तनावर एक छोटेसे चिंतन.....

सन २०१५ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयातील पायाभूत सोयी सुविधा समितीने मंजुरी दिलेले हे प्रकल्प सन २०२५ ते २०२६ मध्ये पूर्ण झाले आहेत यात समृद्धी महामार्गाचा सुद्धा समावेश होतो. यात महाराष्ट्र शासनाची तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते महामंडळाची प्रकल्प पूर्णत्वाची गतिमानता अधोरेखित होते.

मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग हा खोपोलीच्या घाटात वाहनांच्या कोंडीत सापडायचा व पुणे मुंबई प्रवास हा ७ ते ८ तासांचा ठरायचा. त्यानंतर मुंबई पुणे द्रुतगती मार्गाने हा प्रवास ४ ते ५ तासांवर नेऊन ठेवला त्यात घाटातील वळणे सुधारित केली गेली व रस्त्याची रुंदी सुद्धा वाढवली. या मार्गावर घाटात आडोशी व खंडाळा हे दोन टनेल आहेत त्यापैकी आडोशी हा वन वे टनेल तर खंडाळा हा टू वे टनेल आहे. याच



भागात मोठ्या प्रमाणात भूस्खलन व्हायचे व प्रवाशांना पावसाळ्यात गाडी चालवताना जीव मुठीत धरावा लागत असे.

मुंबईकडून पुण्याला जाताना खालापूरच्या फूडमॉलपासून पासून कुसगावपर्यंतचा हा भाग लोणावळा व खंडाळा दरम्यानचा अवघड असा घाट भाग होता. या भागात मुंबई पुणे द्रुतगती मार्गाचे देखभाल व दुरुस्ती केंद्र त्यापुढे वळवण कनेक्टर तसेच लोणावळा व खंडाळा एक्झिट, खंडाळा टनेल तदनंतर अमृतांजन ब्रिज ज्यामुळे कोकण व पुणे भाग विभागला जात होता नंतर दस्तुरी पॉईंट व वनविभागाचे विश्रामगृह, मुंबई पुणे द्रुतगती मार्गाची व राष्ट्रीय महामार्गाची सामायिक लांबी, वाय पॉईंट, अडोशी टनेल तसेच खोपोली एक्झिट असे पॉईंटस आहेत. हा भाग पावसाळ्यात निसर्गसौंदर्याने नटलेला असायचा व गाडीतून जाताना छोटे छोटे धबधबे तसेच हिरवेगार डोंगर मन मोहून टाकायचे.

याच भागात गाड्या बंद पडायच्या व त्या दुरुस्त करण्यासाठी मेकॅनिक हे टू व्हीलरवरून हिंडायचे. बऱ्याच प्रवाशांना प्रश्न पडायचा की द्रुतगती मार्गातून यावर दुचाकी वाहने कशी काय दिसत आहेत? परंतु याच भागात मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर राष्ट्रीय महामार्गाचा सामायिक भाग असल्याने हे दृश्य दिसणे स्वाभाविक होते. परंतु बऱ्याच प्रवाशांना याची कल्पना नाही.राष्ट्रीय महामार्ग व द्रुतगती मार्ग हे सामायिक असल्याने राष्ट्रीय महामार्गावरून दुचाकी वाहनांना प्रवास करता येतो.

नवीन मिसिंग लिंक प्रकल्पात जुन्या मुंबई पुणे द्रुतगती मार्गाची जी अलाइनमेंट होती तीच अलाइनमेंट वापरून हा प्रकल्प पूर्ण केलेला आहे. या प्रकल्पात एक महाकाय टनेल व केबल स्टेड ब्रिजचा समावेश आहे. यामुळे घाटातील अलाइनमेंटला एक सरळता व सुलभता आलेली आहे. टनेल ची लाइटिंग अतिशय उत्तम असून टनेलच्या रुंदीची नोंद ही गिनीज बुकात घ्यावी लागली आहे. सर्वसाधारणपणे २३ मीटर रुंद व दहा मीटर उंच असा हा टनेल किंवा बोगदा आहे.या प्रकल्पामुळे आपणास वेळेची बचत साध्य झालेली आहे व मुंबई ते पुणे हा प्रवास २ ते ३ तासात करणे सहज शक्य झाले आहे.

मालवाहतुकीची वाहने ही मूळ द्रुतगती मार्गावरून तसेच मिसिंग लिंकने प्रवाशांची वाहने पाठवून सुरक्षिततासुद्धा या प्रकल्पाने साध्य केलीआहे.

या प्रकल्पामुळे आता कुसगाव ते खालापूर फूड मॉल मधील वर नमूद केलेले वेगवेगळे पॉईंट्स आपणास दिसणार नाहीत. खंडाळा टनेल व आडोशी टनेल शोधूनसुद्धा सापडणार नाहीत. घाटातील धबधबे आता पावसाळ्यात खुणावणार नाहीत. दस्तुरी पॉईंटला बंद पडलेल्या गाड्या व दुरुस्तीला येणारे मेकॅनिक सुद्धा दिसणार नाहीत. टायगर व्हॅली दिसणार नाही तसेच तेथील सुंदर धबधबा व बॉलीवूडमधील गाण्यांचा शूटिंगचा टेबल टॉपही दिसणार नाही. दस्तुरी व अमृतांजन ब्रिज तसेच खंडाळा टनेलच्या जवळपास होणारी वाहतुकीची कोंडीसुद्धा आता दिसेनाशी होईल. दूरवर डोंगरात दिसणारी रेल्वेची लाईन व खेळण्यासारखी दिसणारी रेल्वे व घाटाखाली नजरेने दिसणारे खोपोली आता गडप झाल्यात जमा आहे.

परिवर्तन संसार का नियम है आणि हेच "परिवर्तन" तसेच रस्त्यावरील वाहतुकीची सुलभता ,सरळता व सुरक्षितता या मिसिंग लिंकमुळे अधोरेखित झालेली आहे. भूतकाळातील काही पॉईंट्स तसेच रस्त्यावरून दिसणारे लोणावळा व खंडाळा तसेच सह्याद्रीचे डोंगर व जलप्रपात आता दिसणार नाहीत.. म्हणतात ना "कुछ पाने के लिए बहुत कुछ खोना भी पडता है"

मुंबई पुणे द्रुतगती मार्गाचा प्रकल्प हा सुरुवातीला १६०० कोटी रुपयांचा होता व तो वाढून २१०० कोटी रुपयांचा झाला असे वाचण्यात आले होते. आता मिसिंग क्लीन चा प्रकल्पही १६०० कोटी रुपयांचा आहे असे वाचण्यात आले.१६०० कोटी रुपयांचा हा योगायोग..असो....

अशा या द्रुतगतीमार्गाच्या मुसाफिरगिरी वर मला "अपनापन" या १९७७ च्या चित्रपटातील हे गाणे गुणगुणावेसे वाटले...

**आदमी मुसाफिर है,**
**आता है, जाता है**
**आते जाते रस्ते में,**
**यादें छोड जाता है**
**झोंका हवा का, पानी का रेला**
**मेले में रह जाये जो अकेला**
**फिर वो अकेला ही रह जाता है**
**क्या साथ लाये, क्या तोड़ आये**
**रस्ते में हम क्या-क्या छोड़ आये**
**मंजिल पे जा के याद आता है**
**आदमी मुसाफिर है,आता है, जाता है**
**आते जाते रस्ते में, यादें छोड जाता है.....**

असा हा मुंबई पुणे द्रुतगती मार्गाचा मिसिंग लिंकवरचा प्रवास तुम्हाला नक्कीच जुन्या काळात घेऊन जाईल. आणि रस्त्यावरील आठवणी ताज्या करेल.

**संतोष विजयकृष्ण कुलकर्णी**

## "शिक्षणातून सामाजिक परिवर्तन घडवणारे कर्मवीर भाऊराव पाटील"

९ मे हा दिवस म्हणजे शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यस्मरणाचा दिवस. महाराष्ट्रातील बहुजन, ग्रामीण आणि वंचित समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणारे हे महान समाजसुधारक होते. त्यांनी आयुष्यभर शिक्षण, स्वावलंबन आणि श्रमप्रतिष्ठेचा संदेश दिला. आजच्या बदलत्या आणि स्पर्धात्मक युगात त्यांचे विचार अधिक महत्त्वाचे वाटतात. कर्मवीर भाऊराव पाटलांनी शिक्षणातून समाज परिवर्तनाची क्रांती केली. शालेय जीवनात त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध आवाज उठवला. त्यांनी शिक्षक म्हणून



काम केले; मात्र उद्योग, व्यवसाय, शेती, नोकरी किंवा राजकारण यामध्ये स्वतःला अडकवून घेतले नाही. संपत्ती जमविण्यापेक्षा त्यांनी समाजातील गरीब, शेतकरी, कष्टकरी आणि बहुजन मुलांच्या शिक्षणासाठी आयुष्य अर्पण केले. सामाजिक आणि शैक्षणिक परिवर्तनाची चळवळ त्यांनी शेवटपर्यंत जिवंत ठेवली."शिका, श्रम करा आणि कमवा" हा त्यांचा मूलमंत्र होता. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना श्रमाची प्रतिष्ठा समजून घेतली पाहिजे, स्वावलंबन अंगीकारले पाहिजे, असे त्यांचे मत होते. विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी पूर्णपणे आई-वडिलांवर अवलंबून राहू नये म्हणून त्यांनी "कमवा आणि शिका" ही अभिनव योजना सुरू केली. विद्यार्थी शेती करणे, पालेभाज्या पिकवणे, विक्री करणे अशी कामे करत आणि त्यातून स्वतःचा निवास व भोजन खर्च भागवत असत. आजच्या काळात "स्किल डेव्हलपमेंट", "स्टार्टअप संस्कृती" आणि "स्वरोजगार" यांची चर्चा होत असताना कर्मवीरांचा हा विचार किती दूरदृष्टीचा होता, हे स्पष्ट होते.सन १९४० मध्ये त्यांनी महाराज सयाजीराव गायकवाड फ्री अ‍ॅण्ड रेसिडेन्शियल स्कूलची स्थापना केली. ग्रामीण भागातील गरीब, एससी, एसटी, ओबीसी, एनटी आणि व्हीजेएनटी समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि वसतिगृहे उभारली. आज हजारो विद्यार्थी या संस्थांमधून शिक्षण घेऊन समाजात विविध क्षेत्रांत यशस्वी होत आहेत. दरम्यान, किर्लोस्करांनी नांगर तयार केला आणि भाऊरावांना त्याच्या विक्रीचे मुख्य विक्रेते केले. भाऊरावांनी विक्री मोठ्या प्रमाणात वाढवली; मात्र व्यवहारातील मतभेदामुळे त्यांनी किर्लोस्करांची साथ सोडली. शेतकऱ्यांना कमी किमतीत नांगर उपलब्ध व्हावा म्हणून धनाजी शहा कपूर, युसूफ खान सावकार आणि पापलिया शेट यांच्या सहकार्याने त्यांनी नांगराचा कारखाना सुरू केला. "बहादूर नंबर १" हा नांगर गावोगावी लोकप्रिय झाला. यातून त्यांच्या उद्योजकतेबरोबरच शेतकरीहिताची जाणीव दिसून येते.भाऊराव पाटील हे खरे अर्थाने सत्यशोधक होते. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, कुप्रथा, रूढी आणि जातिव्यवस्थेविरुद्ध त्यांनी संघर्ष केला. शिक्षण हेच सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, यावर त्यांचा ठाम विश्वास होता.आजच्या काळात शिक्षणाचे व्यापारीकरण वाढत आहे. अनेक गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण परवडत नाही. ग्रामीण भागात अजूनही शैक्षणिक सुविधा अपुऱ्या आहेत. अशा वेळी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे विचार समाजाला नवी दिशा देतात. शिक्षण केवळ पदवी मिळविण्यासाठी नसून ते माणूस घडविण्यासाठी असते, हा संदेश त्यांच्या कार्यातून मिळतो. विद्यार्थ्यांनी मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आहारी न जाता श्रम, प्रामाणिकपणा आणि स्वावलंबन यांची कास धरली पाहिजे.कर्मवीरांचे जीवन हे त्याग, संघर्ष आणि समाजसेवेचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या विचारांचे स्मरण करून शिक्षण, समता आणि मानवतेची मूल्ये जपणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**सौ.शीला सुजित हावळे**
**देगाव उत्तर सोलापूर**